रायगड, नवी मुंबई
राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक १३
www.ramprahar.com
बुधवार ३० जुलै २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

देशातील पहिली इलेक्ट्रिक वॉटर टॅक्सी लवकरच धावणार/२
कर्जतच्या रिसॉर्टमध्ये शॉक लागून युवकाचा मृत्यू/५
जडेजाला डिवचणाऱ्या स्टोक्सला अश्विनने सुनावले खडे बोल/८

## २२ एप्रिलचा बदला २२ मिनिटांत घेतला -पंतप्रधान मोदी

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी (दि. २९) लोकसभेत 'ऑपरेशन सिंदूर'च्या



यशावर बोलताना पाकिस्तानला अत्यंत कठोर शब्दांत इशारा दिला आहे. पाकिस्तानने हल्ला करण्याचा प्रयत्न केल्यास त्याचे परिणाम अत्यंत गंभीर असतील, असे आपण अमेरिकेच्या उपराष्ट्रपतींनाही स्पष्टपणे सांगितल्याचा खुलासा त्यांनी केला. त्याचवेळी या संवेदनशील प्रसंगी काँग्रेस पक्ष बालिशपणा करत होता आणि देशाच्या सुरक्षा दलांचे मनोधैर्य खच्ची करत होता, असा घणाघाती आरोपही पंतप्रधानांनी केला. 'ऑपरेशन सिंदूर'च्या यशाचे वर्णन करताना पंतप्रधान म्हणाले, आम्हाला अभिमान आहे की, ६ आणि ७मे च्या रात्री आम्ही ठरवल्याप्रमाणे दहशतवाद्यांना प्रत्युत्तर दिले. आम्ही हल्ला केला, पण पाकिस्तान काहीही करू शकला नाही. आम्ही २२ एप्रिलचा बदला २२ मिनिटांत घेतला. दहशतवाद्यांच्या म्होरक्यांची झोप आजही उडालेली आहे.

# राज्यात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान

## मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय; प्रोत्साहनपर पुरस्कार दिले जाणार

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राबविण्यात येणार आहे. याबाबतचा निर्णय मंगळवारी (दि. २९) मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. या अभियानात अत्युत्कृष्ट काम केलेल्या ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद यांना प्रोत्साहनपर पुरस्कार देण्यात येणार आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली मंगळवारी राज्य मंत्रिमंडळाची बैठक झाली. या बैठकीत आठ महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. यामध्ये विधी व न्याय, महसूल, ग्रामविकास, जलसंपदा, सहकार व पणन विभागांच्या निर्णयांचा समावेश आहे.

राज्यातील शेतकऱ्यांच्या शेतमालाला रास्त व वाजवी भाव मिळावा यासाठी 'ई-नाम' योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येणार आहे. त्या अंतर्गत राष्ट्रीय नामांकित बाजारतळ स्थापन करणे सुलभ व्हावे यासाठी महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३मध्ये सुधारणा करण्यास मान्यता देण्यात आली.

महिलांवरील अत्याचाराची प्रकरणे निकाली काढण्यासाठी गोंदिया, रत्नागिरी व वाशिम येथे विशेष न्यायालय स्थापन होणार आहे. पिंपरी-चिंचवड (जि. पुणे) येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय आणि दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर अशा दोन न्यायालयांची स्थापना केली जाणार असून पदांना मंजुरी देण्यात आली आहे.

### महिला बचत गटांच्या उत्पादनांसाठी उमेद मॉल

ग्रामीण भागातील महिला बचत गटांच्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी ग्रामविकास विभागाच्या उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत राज्यातील १० जिल्ह्यांमध्ये उमेद मॉल (जिल्हा विक्री केंद्र) उभारण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. या योजनेसाठी २०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

# 'आरडीसीए'ला मिळणार हक्काचे मैदान!

## महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे शिष्टमंडळाला आश्वासन

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनला (आरडीसीए) राज्य शासनाच्या वतीने मैदानासाठी दीर्घ मुदतीकरिता जागा मिळावी यासाठी आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी मंगळवारी (दि. २९) आरडीसीएच्या पदाधिकाऱ्यांसह राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेतली. मंत्रीमहोदयांनी ही मागणी मान्य करीत या संबंधी कार्यवाही करण्याचे निर्देश रायगडच्या जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. त्यामुळे आरडीसीएला हक्काचे मैदान मिळण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे.



आरडीसीएला स्वतःचे मैदान नसल्यामुळे अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. असोसिएशनच्या वतीने घेण्यात येणाऱ्या विविध वयोगटातील मुला-मुलींच्या क्रिकेट स्पर्धा, सराव शिबिरे यासाठी जिल्ह्यातील विविध कंपन्यांकडील किंवा खासगी क्लबकडील मैदानांवर अवलंबून रहावे लागते व त्याची उपलब्धता ही काही मर्यादित दिवसांसाठी होते. या पार्श्वभूमीवर आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील व सहकाऱ्यांनी पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांची नुकतीच भेट घेत या विषयाकडे लक्ष वेधले होते. त्यानुसार आमदारांनी या संदर्भात महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन त्यांना आरसीडीएच्या वतीने प्रस्ताव देऊ, असे सांगितले होते. त्यानुसार शनिवारी ही भेट झाली.

या भेटीवेळी आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांच्यासह आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, उपाध्यक्ष यशवंत साबळे, सदस्य शंकर दळवी, प्रदीप खलाटे, विनय पाटील आदी उपस्थित होते.

या वेळी शिष्टमंडळाने, आरडीसीएला स्वतःच्या हक्काचे मैदान मिळाल्यास जिल्ह्यातील होतकरू खेळाडूंना मोठे व्यासपीठ उपलब्ध करून देता येणार आहे. (पान २ वर..)

# वाढदिवसाला शुभेच्छांचे बॅनर, जाहिरात नको; त्याऐवजी सामाजिक उपक्रम राबवा

## आमदार प्रशांत ठाकूर यांचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचे बॅनर, होर्डिंग्ज लावू नये तसेच वर्तमानपत्र प्रसिद्धी माध्यमांमध्ये जाहिरात देऊ नये; त्याऐवजी सामाजिक उपक्रम आयोजित करा, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने केले आहे.



आमदार प्रशांत ठाकूर यांनी आपल्या आवाहनात पुढे सांगितले की, ५ ऑगस्ट रोजी माझ्या वाढदिवसानिमित्त पदाधिकारी, कार्यकर्ते, हितचिंतक भरभरून शुभेच्छा देत असतात आणि या शुभेच्छांमुळे मला चांगली व अधिक कामे करण्याची सातत्याने प्रेरणा मिळत असते. आपले नेते महाराष्ट्राचे सन्माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा होर्डिंग्ज लावू नये तसेच वर्तमानपत्रात जाहिरात देऊ नका, त्यापेक्षा तो खर्च सामाजिक कार्यासाठी करा, असे आवाहन केले. त्या अनुषंगाने मीसुद्धा आपल्या नेत्याचे अनुकरण करत त्याच धर्तीवर मी सर्वांना आवाहन करीत आहे की, माझ्या वाढदिवसानिमित्त वर्तमानपत्रात जाहिरात, बॅनर, होर्डिंग्ज यावर खर्च करू नका, त्यापेक्षा हा खर्च सामाजिक कार्यात करावा आणि त्या अनुषंगाने आपल्यावर असलेले प्रेम सामाजिक कार्यातून व्यक्त करावे, असेही त्यांनी आपल्या आवाहनातून अधोरेखित केले आहे.

# मोखाडा येथील लोकनेते रामशेठ ठाकूर महाविद्यालयात विकास समितीची बैठक उत्साहात

**मोखाडा : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या मोखाडा येथील लोकनेते रामशेठ ठाकूर महाविद्यालयात मंगळवारी (दि. २९) महाविद्यालय विकास समिती बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला महाविद्यालय विकास समितीचे प्रमुख व 'रयत'चे ज्येष्ठ मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची, तर ऑनलाईन प्रणालीने 'रयत'चे व्हाईस चेअरमन अ‍ॅड. भगीरथ शिंदे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.



या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी महाविद्यालय विकास व आर्टिफिशियल इंटेलिजन्सकरिता ३० लाख रुपयांची देणगी जाहीर केली. यामुळे मोखाड्यातील विद्यार्थ्यांना एआय या आधुनिक तंत्रज्ञान प्रणाली शिक्षणाचा लाभ घेता येणार आहे तसेच लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे शैक्षणिक क्षेत्रातील विशेष योगदानाबद्दल त्यांना पद्मश्री पुरस्कार मिळावा, असा ठराव महाविद्यालयाच्या विकास समितीने सर्वानुमते मंजूर केला.

या बैठकीला पालघर जिल्हा परिषद अध्यक्ष प्रकाश निकम, संस्थेचे माध्यमिक शिक्षण विभागाचे सहसचिव बंडू पवार व संस्थेचे इतर पदाधिकारी, आश्रमशाळेचे प्रकल्प अधिकारी, प्र. प्राचार्य डॉ.ए.एन. चांदोरे व महाविद्यालयाचा सर्व स्टाफ तसेच विकास समितीचे सदस्य आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सर्वप्रथम महाविद्यालय विकास समितीचे प्रमुख लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी महाविद्यालयाची पाहणी केली. त्यानंतर महाविद्यालयात सुरू असलेल्या रंगमंचाचे व प्रशासकीय इमारतीतील दुसऱ्या मजल्यावरील वेगवेगळ्या विकासात्मक कामाचे निरीक्षण करून आवश्यक त्या पुढील सूचना दिल्या. (पान २ वर..)



# 'ज्योतीने तेजाची आरती'

## गदिमा-बाबूजींना सांगीतिक मानवंदना

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्राचे आधुनिक वाल्मिकी ग.दि. माडगूळकर आणि ज्येष्ठ संगीतकार सुधीर फडके उर्फ बाबूजी यांच्या अजरामर कार्याला मानवंदना असलेल्या ज्योतीने तेजाची आरती या संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन कार्यसम्राट व लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त ४ ऑगस्ट रोजी सायंकाळी ७.३० वाजता पनवेलमध्ये करण्यात आले आहे.

भाजप रायगड जिल्हा सांस्कृतिक सेलच्या वतीने आयोजित भावगीते, भक्तिगीते आणि चित्रपट गीतांचा हा बहारदार कार्यक्रम पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात होणार असून प्रवेश विनामूल्य असणार आहे. या कार्यक्रमाचे निर्माता विवेक भागवत, गायक मंदार आपटे, धनश्री देशपांडे, नचिकेत देसाई, प्रीती निमकर व निवेदक म्हणून अनघा मोडक असणार आहेत.

**लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त ४ ऑगस्टला कार्यक्रम**

मोफत प्रवेशिका मिळण्याचे ठिकाण फडके नाट्यगृह असून अधिक माहितीसाठी अभिषेक पटवर्धन (८६६८३३२१५९), गणेश जगताप (९८७०११६९६४), वैभव बुवा (९०२९४१०६९९) किंवा आदित्य उपाध्ये (८२९११९७५२६) यांच्याशी संपर्क साधावा.

**पुणे रेव्ह पार्टी**

# पाच जणांना पोलीस कोठडी


**पुणे : प्रतिनिधी**

संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडवून देणाऱ्या हाय-प्रोफाइल पुणे रेव्ह पार्टीप्रकरणी मुख्य आरोपी प्रांजल खेवलकरसह पाच जणांना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे, तर दोन महिला आरोपींना न्यायालयीन कोठडीत पाठवण्याचा आदेश न्यायालयाने मंगळवारी (दि. २९) दिला.

सरकारी वकिलांनी या प्रकरणाचे गांभीर्य कोर्टाच्या लक्षात आणून दिले. 'ही केस अमली पदार्थ विरोधी कायद्यांतर्गत असल्याने अत्यंत गंभीर स्वरूपाची आहे. त्यामुळे आरोपींना जामीन देता येणार नाही,' असे त्यांनी ठामपणे सांगितले. बचाव पक्षाने आपली बाजू मांडली.

# आमदार प्रशांत ठाकूर चषक वक्तृत्व स्पर्धा ठरतेय विद्यार्थ्यांच्या स्वप्नांचा मंच!

## शाळा अंतर्गत फेरी उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धा विद्यार्थ्यांना व्यक्त होण्यासाठीचे प्रभावी व्यासपीठ ठरत आहे. या उपक्रमाचा भाग म्हणून लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल कामोठे आणि चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालय नवीन पनवेल येथे शाळा अंतर्गत फेरी उत्साहात झाली.

या फेरीत विद्यार्थ्यांनी माझं स्वप्न, माझा मित्र, प्लास्टिकमुक्त भारत, स्वच्छ भारत यांसारख्या विषयांवर प्रभावीपणे विचार मांडले. याद्वारे त्यांनी भाषण कलेचा सराव करताना आत्मविश्वास, संवाद कौशल्य आणि मंचावर उभे राहण्याचे बळ मिळवले. (पान २ वर..)

> **आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धेसारख्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मकता, आत्मविश्वास आणि संवाद कौशल्य वाढते. हे व्यासपीठ मुलांना पुढील स्पर्धात्मक विश्वासाठी तयार करते.**
> **-नीलिमा शिंदे, मुख्याध्यापक, सीकेटी विद्यालय प्राथमिक विभाग, नवीन पनवेल**



# देशातील पहिली इलेक्ट्रिक वॉटर टॅक्सी मुंबईत लवकरच धावणार

## प्रवाशांची वाहतूक कोंडीतून होणार सुटका

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

पूर्णपणे स्वदेशी बनावटीची पर्यावरणपूरक आणि आधुनिक सुविधांनी सुसज्ज असलेली देशातील पहिली इलेक्ट्रिक वॉटर टॅक्सी आता लवकरच मुंबईकरांच्या सेवेत दाखल होण्यास सज्ज झाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, येत्या ऑगस्ट महिन्यापासून ही इलेक्ट्रिक वॉटर टॅक्सी गेटवे ऑफ इंडिया ते जेएनपीटी आणि डोमेस्टिक क्रूझ टर्मिनस ते जेएनपीटी या दोन जलमार्गांवर नियमितपणे धावणार आहे.

या देशातील पहिल्या इलेक्ट्रिक वॉटर टॅक्सीमुळं मुंबईतील जलवाहतुकीला अधिक चालना मिळणार असून, मुंबईतल्या वाढत्या वाहतूक कोंडीवर हा एक उपाय मानला जातोय. दुसरीकडे मुंबईतील वाढतं प्रदूषण कमी करण्यासाठी ही इलेक्ट्रिक वॉटर टॅक्सी एक सकारात्मक उपाय असल्याचं म्हटलं जातंय.



मुंबईकरांचा मुख्यतः प्रवास उपनगरीय रेल्वे वाहतूक म्हणजेच लोकल ट्रेन आणि रस्ते मार्गानं होत असतो. एका बाजूला लोकल ट्रेनमधील गर्दी तर दुसऱ्या बाजूला रस्त्यावरील वाहतूक कोंडी यात मुंबईकरांच्या दिवस जातो, असं म्हटलं जातं. मुंबईत लोकल ट्रेननं सुमारे ६० लाख प्रवासी दररोज प्रवास करतात. तर, रस्ते मार्गानं देखील लाखो प्रवासी दररोज प्रवास करतात. अशात होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळं मुंबईकरांचा बराचसा वेळ हा प्रवासातच जातो. मुंबईला समुद्रकिनारा लाभला असला तरी मुंबईत डोमेस्टिक सागरी वाहतूक नाही. त्यामुळं ऑगस्ट महिन्यात सुरू होणारी देशातील पहिली इलेक्ट्रिक वॉटर टॅक्सी मुंबईतील जलवाहतुकीच्या दृष्टीनं एक महत्त्वाचं पाऊल मानलं जात आहे.

ऑगस्ट महिन्यात सुरू होणारी देशातील पहिली इलेक्ट्रिक वॉटर टॅक्सी सेवा केवळ गेटवे ऑफ इंडिया ते जेएनपीटी या एका मार्गापुरती मर्यादित न राहता टप्प्याटप्प्यानं बेलापूर, खारापुरी आणि मांडवा यांसारख्या महत्त्वाच्या किनारपट्टी शहरांपर्यंत विस्तारित करण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनानं दिलीय. या वॉटर टॅक्सीमुळं मुंबईसह ठाण्यातील दररोज लोकल ट्रेनचे धक्के खात प्रवास करणाऱ्या लाखो प्रवाशांना एक नवा स्वतंत्र स्वस्त आणि पर्यावरण पूरक जलवाहतुकीच्या पर्याय उपलब्ध होणार आहे.

### टॅक्सीचे तिकीट दर?

***ऑगस्ट महिन्यात सुरु होणारी ही वॉटर टॅक्सी बॅटरीवर चालणार असल्यानं या वॉटर टॅक्सीची देखभाल आणि त्याचा ऑपरेटिंग खर्च कमी असणार आहे. त्याचा परिणाम म्हणजे ऑपरेटिंग खर्च कमी असल्याने या इलेक्ट्रिक वॉटर टॅक्सीचे तिकीट दर हे सामान्य प्रवाशांना परवडतील असेच असणार आहेत, अशी माहिती प्रशासनानं दिलीय.***

सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे, ही वॉटर टॅक्सी परदेशातून आयात न करता माझगाव डॉक शिपबिल्डिंग लिमिटेड यांनी पूर्णतः स्वदेशी तंत्रज्ञानाचा वापर करून तयार करण्यात आलीय. देशातच निर्मिती झालेली ही पहिली इलेक्ट्रिक वॉटर टॅक्सी असून, माझगाव डॉक शिपबिल्डिंग लिमिटेडनं अशा एकूण ६ वॉटर टॅक्सी तयार केल्या आहेत. यामधील २४ प्रवाशांच्या आसनाची व्यवस्था असलेली पूर्णपणे वातानुकूलित वॉटर टॅक्सी सध्या पुढील कार्यवाही करिता इन्फिनिटी हार्बर सर्व्हिसेस या कंपनीकडे सुपूर्द करण्यात आलीय.

**हा प्रकल्प केंद्र सरकारच्या माध्यमातून आपण सुरु करत आहोत. या प्रकल्पामुळं मुंबईकरांना निश्चितच फायदा होणार आहे,**

**– नितेश राणे, राज्याचे मत्स्य व बंदर विकासमंत्री**

इन्फिनिटी हार्बर सर्व्हिसेस कंपनी आणि राज्य सरकारशी सर्व कागदोपत्री करार पूर्ण झाला असून, सदर इलेक्ट्रिक वॉटर टॅक्सी सध्या अंतिम तांत्रिक चाचण्यांच्या टप्प्यात आहे. येत्या काही दिवसांत ती समुद्रात उतरणार असल्याची माहिती इन्फिनिटी हार्बर सर्व्हिसेस कंपनीनं दिलीय.

# मच्छीमारांच्या प्रश्नांबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांची मत्स्यव्यवसाय सहाय्यक आयुक्तांशी चर्चा



**अलिबाग : प्रतिनिधी**

आमदार प्रशांत ठाकूर यांनी सोमवारी (दि. २८) मत्स्यव्यवसाय सहाय्यक आयुक्त संजय पाटील यांची भेट घेऊन अलिबाग तालुक्यातील धेरंड परिसरातील मच्छीमारांच्या समस्यांबाबत चर्चा केली.

यावेळी दरेश्वर मच्छीमार सोसायटीचे चेअरमन धर्माजी सखाराम पाटील, धेरंडगावचे केंद्रप्रमुख गोविंद कृष्णा पाटील, मच्छीमार यावेळी उपस्थित होते. या भागतील मच्छिरांचे वादळात नुकसान झाले. त्यांना नुकसान भरपाई अद्याप मिळाली नाही. त्यात काही अडचणी असतील तर वरिष्ठांशी बोलून त्या दूर करा आणि या मच्छीमारांना नुकसान भरपाई मिळवून द्या अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी या बैठकीत केली.

मच्छीमारांचे तीन कोटी ८२ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. ती नुकसान भरपाई मिळावी. जे एस डब्ल्यू कंपनी रासायनिक पाणी थेट खाडीत सोडत असल्यामुळे धरमतर खाडीत मासळी मिळत नसल्याने मच्छीमारांचे नुकसान होत आहे. त्यावर कारवाई करावी. तसेच इतरही काही मागण्या आहेत.

या संदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांनी मत्स्यव्यवसाय सहाय्यक आयुक्तांशी चर्चा केली. बंदर विकासमंत्री नितेश राणेंना आमच्या मागण्यांचे निवेदन देण्यात आले असल्याची माहिती गोविंद पाटील यांनी दिली.

# बचत गटातील महिलांनी तयार केल्या दीड लाख गणेशमूर्ती

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील विविध महिला बचतगटातील २२८ महिलांनी उमेद अभियान अंतर्गत गणपती मूर्ती व्यवसायात पाऊल ठेवले आहे. या व्यवसायातून महिलांना आर्थिक स्थैर्य प्राप्त झाले आहे. यामधून कोट्यवधी रुपयांची उलाढाल होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक प्रियदर्शिनी मोरे यांनी बचत गटातील महिलांना व्यवसायाच्या दृष्टीने मार्गदर्शन केल्याने, जिल्ह्यातील महिला शक्ती गणपती मूर्ती व्यवसायात गरुड झेप घेऊ शकल्या आहेत.



रायगड जिल्ह्यातील पेण तालुका गणपती मूर्तींचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. पेणमध्ये तयार केलेल्या गणपती मूर्तींना देश, विदेशात मोठी मागणी आहे. सुबक आखणी, नेटकी बैठक, सुंदर कोरीवकाम, डोळ्यांची रचना आणि रंगकाम यामुळे पेणच्या गणपती मूर्तींना स्वतची खास ओळख प्राप्त झाली असून, गणपती मूर्तींना गणेशमूर्तींना भौगोलिक मानांकन मिळाले आहे. या व्यवसायात पेण तालुक्यातील महिला बचतगट उतरले आहेत.

ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत पेण तालुक्यातील विविध बचत गटातील २२८ महिला या गणपती व्यवसायात सहभागी झाल्या आहेत. महिला बचत गटांनी १ लाख ५६ हजार २० गणपती मूर्ती तयार केल्या असून, यामधील १ हजार ५०० गणपती मूर्ती परदेशात पाठविण्यात आल्या आहेत. गणपती मूर्ती व्यवसायातून कोट्यवधी रुपयांची उलाढाल होण्याची अपेक्षा आहे. व्यवसायासाठी उमेद अभियान मार्फत महिला बचत गटांना फिरता निधी तसेच ग्राम संघांना समुदाय गुंतवणूक निधी आणि बँकांमार्फत पतपुरवठा करण्यात आला असून, महिलांच्या या व्यवसायाला गती प्राप्त झाली आहे. या व्यवसायामुळे महिलांच्या हाताला काम मिळाल्यामुळे त्या अधिक सक्षम झाल्या आहेत.

पेण तालुक्यातील बचतगटातील महिला तयार करीत असलेल्या गणपती मूर्तींची पाहणी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले व जिल्हाधिकारी जिल्हा ग्रामीण विकास अधिकारी प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे यांनी केली. यावेळी त्यांनी या व्यवसायातील बारकावे जाणून घेतले. तसेच त्यांना भेडसावणाऱ्या समस्या जाणून घेतल्या. गणपती मूर्ती व्यवसाय करणाऱ्या महिलांना भेडसावणाऱ्या समस्या सोडविण्याकरिता प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन यावेळी अधिकाऱ्यांनी दिले

# १ ऑगस्टपासून कर्जत पूर्वेकडून सुटणार एनएमएमटी बस

**कर्जत : प्रतिनिधी**

नवी मुंबई महापालिकेच्या परिवहन विभागाने कर्जतच्या प्रवशांसाठी बसची सुविधा सुरु केली. या बस कर्जतच्या पश्चिम भागातून सुटत असल्याने प्रवाशांना अडचणीचे ठरत होते. याबाबत किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष सुनील गोगटे यांनी नवी मुंबई महापालिकेकडे पाठपुरावा केला. त्यांच्या या पाठपुराव्याला यश आले.

आता येत्या १ ऑगष्ट पासून या बस कर्जतच्या पूर्व भागात असलेल्या अग्निशमन केंद्रा जवळून सुटणार असल्याने प्रवाशांची गैरसोय दूर होणार आहे.

कोरोना काळात एसटी बस बंद होत्या. त्यानंतर एसटी कर्मचाऱ्यांचा संप होता. त्यावेळी आमदार महेंद्र थोरवे यांच्या प्रयत्नाने नवी मुंबई महापालिकेच्या परिवहन विभागाने कर्जतच्या प्रवशांसाठी बेलापूर पर्यंत बसची सुविधा सुरु केली. मात्र ही बस सेवा पश्चिम भागातून सुटत असल्याने प्रवाशांना बस पकडण्यासाठी तेथपर्यंत रिक्षेने किंवा चालत यावे लागत असे.

किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष सुनील गोगटे यांनी या बस पूर्वे कडून सोडव्यात यासाठी नवी मुंबई महापालिकेच्या परिवहन विभागाकडे पाठपुरावा केला. त्यांना कर्जतचा नव्वद टक्के राहिवासी पूर्व भागाकडे आहे. हे पटवून दिले. त्यानंतर परिवहन विभागाचे अधिकारी येऊन त्यांनी पाहणी केली आणि बस पूर्वेकडून सोडण्याचा निर्णय घेतला.

१ ऑगष्ट रोजी सकाळी दहा वाजता या बस पूर्वे कडून सोडण्याचा शुभारंभ सोहळा आयोजित केला आहे. या सोहळ्याला नवी मुंबई परिवहनचे मुख्य वाहतूक अधिकारी सुनील साळुंखे, मुख्य नियोजन अधिकारी उमाकांत जंगले, सहाय्यक वाहतूक अधीक्षक धर्मराज भगत, श्रमिक सेना युनियन सरचिटणीस चरण जाधव, किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष सुनील गोगटे उपस्थित राहणार आहेत. १ ऑगष्ट पासून ही सेवा सुरु होणार असल्याने प्रवासी वर्ग आंनदी झाला आहे.

## नागपंचमी घरोघरी साजरी

**उरण : वार्ताहर**

नागपंचमी मंगळवार ( दि.२९) रोजी असल्याने महिला वर्गाने आपल्या घरोघरी नागपंचमी साजरी केली पारंपारिक मातीच्या नागाची यथासांग पूजा केली.नागोबाला नैवेद्य ठेवून आरती केली . काही महिला वर्गानी महादेवाच्या मंदिरात पिंडी वरील नागाची पूजा केली .दुध,लाह्या ,बेल फुले वाहून पूजा केली .महिला वर्ग आनंदात दिसत होत्या.परिवार सह महादेवाच्या मंदिरात पूजा केली



# माणगावजवळ एसटी बसला अपघात; नऊ जण जखमी

**माणगाव : बातमीदार, प्रतिनिधी**

माणगाव पासून १५ किमी अंतरावर असणाऱ्या मौजे रातवड गावच्या हद्दीत मंगळवारी (दि. २९) मुंबई गोवा महामार्गावर एसटी बसला पलटी झाल्याने ७ जण जखमी झाल्याची घटना घडली आहे.

श्रीवर्धन भिंवडी एम.एच २० बी.एल ३६२० ही एस.टी बस सायंकाळी ५ वाजता रातवड हद्दी मध्ये आली असता या एस. टी. चालकाचा एस,टी.बस वरून ताबा सुटला आणि ही एस.टी बस थेट शेतात पल्टी झाली यातील चालक व वाहन चालकासहीत एकूण २४ प्रवासी प्रवास करत होते. जखमींमध्ये निकिता जितेंद्र पवार (वय ३० वर्ष) रा. चोचिंदे महाड, जितेंद्र संजय पवार (वय ३५ वर्ष) रा.चोचिंदे महाड, जिनल जितेंद्र पवार (वय ९ वर्ष) रा. चोचिंदे महाड, महेश मारुती जाधव (वय २४ वर्षे )वर्ष रा.गारभट आदिवासी वाडी रोहा, रोहित पांडे (वय ३० वर्ष )रा. बिहार, माया सुनील जाधव (वय ५५ वर्ष) रा. कालिंदे तळा , आशा महेश जाधव (वय २६ वर्ष) रा. गारभट आदिवासी वाडी रोहा, अमृता महेश जाधव (वय ८ वर्ष) रा. गारभट आदिवासी वाडी रोहा, मयुरेश महेश जाधव (वय ३ वर्ष) गारभट आदिवासी वाडी रोहा हे प्रवासी जखमी झाली आहेत.



या अपघाताची माहीत मिळताच माणगांव पोलिस ठाण्याचे पोलिस निरिक्षक निवृत्ती बोराडे, सहाय्यक पोलिस निरीक्षक नरेंद्र बेलदार तसेच पोलिस कर्मचारी यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन जखमी प्रवाशांना माणगांव उपजिल्हा रूग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे.

पान १ वरून

## ‘आरडीसीए’ला मिळणार हक्काचे मैदान!

क्रीडांगणासाठी दीर्घकालीन करारावर जागा उपलब्ध करून दिल्यास निधी उपलब्ध होईल, असे महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन (एमसीए)कडून लिखित स्वरूपाचे पत्र दिले आहे. त्यामुळे रायगड जिल्ह्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी शासकीय जागा दीर्घकालीन कराराच्या योजनेत वापरण्यासाठी द्यावी, असा प्रस्ताव मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना दिला. त्यावर मंत्री बावनकुळे यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आणि जिल्हाधिकाऱ्यांनी जागेचा शोध घेऊन प्रस्ताव शासनाला सादर करावा, असे निर्देश दिले आहेत.

## मोखाडा येथील लोकनेते रामशेठ ठाकूर महाविद्यालयात विकास समितीची बैठक उत्साहात






या वेळी महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग यांच्या वतीने तारपा नृत्याचे विशेष आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर महाविद्यालय आवारात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले. या आदिवासी भागातील विद्यार्थी पुढे जावा व त्याच्या शिक्षणामध्ये सोयी सुविधा निर्माण व्हाव्यात या दृष्टीने विचार करून लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी महाविद्यालय विकास व आर्टिफिशियल इंटेलिजन्सकरिता ३० लाख रुपयांची देणगी जाहीर केली त्याबद्दल संस्थेचे व्हाईस चेअरमन ॲड. भगीरथ शिंदे व महाविद्यालय विकास समितीचे सर्व सदस्य यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे विशेष आभार व्यक्त केले.

या बैठकीत आदिवासी भागामध्ये लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या विशेष शैक्षणिक योगदानाबद्दल महाविद्यालयाच्या विकास समितीने त्यांना पद्मश्री पुरस्कार मिळावा यासाठी सर्वानुमते या बैठकीमध्ये एकमताने ठराव मंजूर करण्यात आला व हा प्रस्ताव महाविद्यालयाच्या वतीने संस्था पातळीवर पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येणार आहे.

सध्या महाविद्यालयात चालू असलेले वेगवेगळे उपक्रम व पुढील वाटचालीस महाविद्यालयाचे विकास समितीचे प्रमुख व ॲड. भगीरथ शिंदे यांनी शुभेच्छा दिल्या. उपस्थितांचे आभार प्रा. एस.ए. फुंदे यांनी मानले.

## आमदार प्रशांत ठाकूर चषक वक्तृत्व स्पर्धा ठरतेय विद्यार्थ्यांच्या स्वप्नांचा मंच!

विशेष म्हणजे या शाळा अंतर्गत फेरीतून प्रत्येक इयत्तेतून तीन विद्यार्थी पुढील आंतरशालेय फेरीसाठी निवडले जाणार आहेत. यामुळे शालेय स्तरावरूनच विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मकतेची रूजवणूक होत आहे.

या स्पर्धेमुळे महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांनाही समान संधी मिळत आहे. कोशिश फाउंडेशन व पनवेल महापालिका यांच्या पुढाकारातून आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या संकल्पनेतून हे आयोजन यशस्वीपणे करण्यात येत आहे. शाळेतील शिक्षक, पालक आणि विद्यार्थी सर्वांनीच या स्पर्धेला मोठा प्रतिसाद दिला असून निवड झालेल्या विद्यार्थ्यांची पुढील अंतरशालेय फेरीसाठी तयारी जोमात सुरू आहे.

# चिपळे येथील रस्त्यांची डागडुजी करा

## भाजपची सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चिपळे पूल ते नेरे रस्ता दुरुस्त करा व चिपळे येथील जेपी हॉटेल जवल स्पीड ब्रेकर बसवण्यात यावा, अशी मागणी भारतीय जनता युवा मोर्चाकडून सार्वजनिक बांधकाम विभाग, पनवेलकडे करण्यात आली आहे.



भाजप युवा मोर्चा पनवेल तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पनवेल-माथेरान रोड येथील चिपळे पूल ते जेपी हॉटेल परिसरातील चिपळे गावात प्रवेशद्वार अगोदर स्पीड ब्रेकर बसविण्यात यावे. त्या रस्त्यामध्ये चिपळे गावात जाण्या-येण्यासाठी जास्त वर्दळ व वाहतूक तसेच शाळेतील मुलांची ये-जा असते, शाळयातील स्कूल व्हॅन, बसेसदेखील चिपळे गावातील रस्त्यावर ये-जा करत असता त्यामुळे तेथे अपघात होण्याची दाट शक्यता आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या त्याच रस्त्यावर याअगोदर स्पीड ब्रेकर होते, मात्र नवीन रस्त्यावरदेखील स्पीड ब्रेकर बसविण्यात यावे.

रस्त्यावराची वर्दळ तसेच शाळयातील मुलांची वर्दळ, वयोवृध्द नागरीकांची सततची होत असलेली मागणी लक्षात घेवून आपण लवकरात स्पीड ब्रेकर बसविण्यात ही विनंती. मागणी मान्य न झाल्यास भारतीय जनता युवा मोर्चा यांच्या वतीने तीव्र स्वरुपाचे आंदोलन करण्यात येईल या आंदोलनास आपण सर्वस्वी जबाबदार असाल.

यासोबतच दुसऱ्या पत्रात त्यांनी म्हटले आहे की, पनवेल-माथेरान रोड येथील चिपळे पूल ते नेरे येथील रस्त्यावर मोठ-मोठे खड्डे पडले आहेत. त्या खड्ड्यामुळे वाहनाचे अपघात होत आहेत व जिवीत हानी होण्याची दाट शक्यता आहे. तसेच येथील नागरीकांना दळणवळणसाठी नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्याचबरोबर वाहनचालकांना तारेवरची कसरत करून वाहन चालवायला लागत आहे. रस्त्याची लवकरात लवकर दुरुस्ती केली नाही तर भारतीय जनता युवा मोर्चा यांच्या वतीने तीव्र स्वरुपाचे आआंदोलन करण्यात येईल व या आंदोलनास आपण सर्वस्वी जबाबदार असाल.

सहा. अभियंता यांना निवेदन देतेवेळी भाजयुमो तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील, भाजप चिपळे अध्यक्ष समीर पाटील, ॲड. रोहीत पाटील, रमाकांत ठोंबर उपस्थित होते.

# सुकापूरच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना वह्यावाटप






**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या माध्यमातून सुकापूर येथील शाळांमधील विद्यार्थ्यांना आज वह्यांचे वाटप करण्यात आले. भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले असून त्यांनी मार्गदर्शन करत वह्यांचा वापर करून चांगला अभ्यास करून आपले भविष्य उज्वल करावे असा सल्ला विद्यार्थ्यांना दिला

श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या माध्यमातून गेल्या तीस वर्षांपासून दरवर्षी विविध शैक्षणिक उपक्रम राबवून गरजू विद्यार्थ्यांची मदत करण्याचे काम होत आहे. त्यानुसार मंडळाच्या वतीने दरवर्षी प्रमाणे यांदाही गरजू विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात येत आले. मंगळवारी सुकापूर येथील रायगड एज्युकेशन सोसायटीच्या न्यू इंग्लीश स्कूल आणि सेंट मेरी स्कूलमध्ये वह्यांचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाला रायगड जिल्हा परिषदेचे माजी सदस्य राजेंद्र पाटील, अमित जाधव, नवीन पनवेल मंडल अध्यक्ष दशरथ म्हात्रे, पनवेल तालुका पूर्व मंडल अध्यक्ष भुपेंद्र पाटील, उपसरपंच दिवेश भगत, माजी उपसरपंच बुवाशेठ भगत, विभागीय अध्यक्ष किशोर सुरते, तालुका चिटणीस यतिन पाटील, ग्रामपंचायत सदस्य अशोक पाटील, महेश पाटील, आत्माराम पाटील, ज्ञानेश्वर पाटील, हनुमंत खुटले, शशीकांत पाटील, चंद्रकांत पोपेटा, उदय म्हस्कत, राहुल पोपेटा, निळकंठ पाटील, मीना साजवान यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# मिरची गल्लीमध्ये वीजचोरीवर धाड

**पनवेल : वार्ताहर**

भांडुप महावितरणाचे कर्तव्यदक्ष मुख्य अभियंता संजय पाटील यांना एका गुप्त माहीतीदाराने पनवेल मिरची गल्ली येथे छुप्या पध्दतीने मिटरची छेडछाड करून वीजचोरी केली जात असल्याची माहीती मिळाली या बाबत त्यांनी तत्काळ सदर विजचोरी बाबत अधिकारी यांना सवीस्तर माहीती देऊन कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले

या बाबत पनवेल महावितरणाने वरीष्ठांचे आदेश मिळताच शोध मोहीमेअंतर्गत पनवेल मिरची गल्ली येथील स्वेअर रीॲलीटी इमारतीमध्ये प्लॅट क्रमांक १०२ मधील बंगाली कारागीर राजु पराई याने महावितरणाच्या इलेक्ट्रीक विद्युत मिटर मध्ये छेडछाड करून मिटर बायपास करून विज चोरी केल्याचे महावितरणाच्या धाडीत उघड झाले भारतीय विद्युत कायदा २००३ अंतर्गत कलम १३५ अन्वये सदर कारवाई करण्यात आली सदर बंगली कारागीराने सुमारे २९१७ युनिटची चोरी केल्याने त्याला या युनिटचे सुमारे ८०,९५० रूपयाचे बील महावितरणाकडुन देण्यात आले.

या यशस्वी मोहीमेत, सहाय्यक अभियंता विजय मिश्रा, सुप्रीया बल्लाळ सहाय्यक अभियंता यांनी सहभाग घेऊन ही मोहीम यशस्वी केल्याने विज चोरी करणारे ग्राहकांमध्ये चाप बसणार असल्याचे बोलले जात आहे.

# महिला दुचाकीस्वाराचा विनयभंग; गुन्हा दाखल

**पनवेल :** कळंबोली सर्कलसमोरील बिमा ब्रिजच्या सुरूवातीस पनवेल मुंब्रा रोड कळंबोली येथे दुचाकीवरून जाणाऱ्या महिलेचा व तिच्या मैत्रिणीचा एका दुचाकीस्वाराने विनयभंग करण्याची घटना घडली आहे. याप्रकरणी दुचाकीस्वाराविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. २५ जुलै रोजी यातील तक्रारदार महिला ही मैत्रिणीसोबत दुचाकीवरून जात कळंबोली सर्कल समोरील, बिमा ब्रिजच्या सुरूवातीस पनवेल-मुंब्रा रोड कळंबोली येथे आलेल्या एका दुचाकीस्वाराने दुचाकीवरील महिलेकडे पाहुन अश्लिल हातवारे व इशारे करण्यासह धक्का दिला. तसेच महिलेच्या मैत्रिणीला हाताने मारहाण करण्यासह शिवीगाळ करून पलायन करण्याचा प्रकार घडला.

महिलेने विनयभंग करणाऱ्या दुचाकीस्वाराच्या दुचाकीचा नंबर तक्रारीत नमूद केला आहे. या तक्रारीवरून दुचाकीस्वाराविरोधात कळंबोली पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# एमएनएम विद्यालयात घोषवाक्य लेखन स्पर्धा

पनवेल : रामप्रहर वृत्त

जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या मोरू नारायण म्हात्रे विद्यालय (एमएनएम) व तुकाराम नारायण घरत ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्समध्ये संस्थेचे चेअरमन माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी पदार्पण वर्षाबद्दल शाळेच्या प्राथमिक विभागातर्फे आंतर शालेय घोषवाक्य लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.



स्पर्धेमध्ये संस्थेच्या विविध संलग्न प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी तसेच लेडी खातून मरियम (न्हावा) शाळेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे उद्घाटन शालेय व्यवस्थापन समिती सदस्य रघुनाथ देशमुख यांनी केले. शाळेच्या मुख्याध्यापिका सायली वडवलकर यांनी उपस्थित सर्व स्पर्धकांना शुभेच्छा देत विद्यार्थ्यांच्या कल्पकता सृजनशीलता, अभिव्यक्ती, याला वाव मिळत असून विद्यार्थ्यांच्या विकासासाठी वरील स्पर्धा पोषक असल्याचे प्रतिपादन केले.

घोषवाक्य लेखन स्पर्धेचे परीक्षण इंग्रजी विषयाचे प्राध्यापक राहुल म्हात्रे व पालक प्रतिनिधी अश्विनी घरत यांनी केले.

शाळेच्या माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका प्रणिता गोळे यांनी उपस्थित स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या. शाळेच्या सांस्कृतिक विभागाच्या रतिका ठाकूर, शर्मिन काझी यांनी कार्यक्रमासाठी विशेष प्रयत्न करत विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले.

# सराईत रिक्षाचोर गजाआड

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरात रिक्षा चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगारास पनवेल शहर पोलिसांनी गजाआड करून चोरीतील दोन्ही रिक्षा हस्तगत केल्या आहेत.

पनवेल शहरातील पटवर्धन हॉस्पिटल समोरील रोडवर उभी करून ठेवलेली रिक्षा तसेच अशाच प्रकारे परिसरात उभी करून ठेवलेली रिक्षा आरोपी अक्षय चव्हाण (वय २२) याने चोरून तो पसार झाला होता. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल होताच पोलिसांच्या पथकाने आरोपीला पनवेल परिसरातून ताब्यात घेतले. त्याच्याकडून चोरीच्या दोन रिक्षा हस्तगत केल्या



आहेत. त्याच्या अटकेमुळे अजूनही काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

# 'सीकेटी'तर्फे करंजाडेत वृक्षारोपण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजचे एन.सी.सी. विभाग आणि लायन्स क्लब नवीन पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि.२७) करंजाडे ग्रामपंचायत येथे वृक्षारोपण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यासमयी करंजाडे ग्रामपंचायतचे सदस्य व स्वयंसेवक आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली.



महाविद्यालयातील एकूण ६० कॅडेट्सचा सहभाग होता. कार्यक्रमदिनी महाविद्यालयाच्या एनसीसी विभागाचे कॅडेट्स तथा एनसीसी अधिकाऱ्यांच्या चमुने सकाळी ०९.३० वाजता उपक्रमस्थळाकरीता महाविद्यालयातुन प्रस्थान केले. या चमूचे करंजाडे ग्रामपंचायत सदस्य आणि कर्मचाऱ्यामार्फत स्वागत करण्यात आले.

मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपणाच्या उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यासोबतच उपस्थित विद्यार्थी आणि एनसीसी अधिकारी यांनी वेगवेगळ्या प्रकाराच्या एकूण १५० रोपांची लागवड करत पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. या वेळी करंजाडे ग्रामपंचायतचे यांचे विशेष सहकार्य लाभले.

वृक्षारोपण मोहिमेच्या यशस्वी नियोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ.एस.के.पाटील व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ.बी.डी.आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली एन.सी.सी.विभागाच्या ए.एन. ओ. लेफ्टनंट प्रा. निलीमा तिदार, सी.टी.ओ. प्रा. एस.एस. व्यवहारे, सी.टी.ओ. डॉ. जे. एम. पावरा यांनी विशेष परिश्रम घेतले.

# पनवेल मनपा लघुपट स्पर्धेच्या पोस्टरचे अनावरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या संकल्पनेतून प्रगतीशील पनवेल ही भव्य दिव्य अशी लघूपट स्पर्धा (शॉर्टफिल्म) महापालिकेमार्फत आयोजित करण्यात आली आहे. या लघूपट स्पर्धेचे प्रचार प्रसिद्धी पोस्टर अनावरण आज २९ जुलै रोजी आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त वैभव विधाते, उपायुक्त प्रसेनजित कारलेकर, सहाय्यक आयुक्त डॉ. रूपाली माने, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर, जनसंपर्क अधिकारी वर्षा कुलकर्णी उपस्थित होते.



विकसनशील विकासात्मक प्रगतीशील अशी पनवेल महानगरपालिकेची वाटचाल सुरू आहे.१ ऑक्टोबरपासुन पनवेल मनपा आपल्या दशकपूर्ती वर्षात पदार्पण करीत आहे. मनपाने गत नऊ वर्षांच्या कालावधीत विविध विकासात्मक कामे केलेली आहे. या अनुषंगाने ही लघूपट स्पर्धा जाहिर करण्यात आली आहे.

ही स्पर्धा सर्वांसाठी खुली आहे. लघुपटाचा कालावधी दहा ते पंधरा मिनिटे एवढाच असेल. मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषेतील लघुपट पात्र असतील, मात्र 'प्रगतीशील पनवेल' हा विषय केंद्रभागी असणे महत्त्वाचे आहे. स्पर्धेत भाग घेण्यासाठी shortfilmpmc@gmail.com या ईमेल आयडी वरती नोंदणी आवश्यक आहे.

स्पर्धेसाठी एकुण २० पारितोषिके देण्यात येणार असून त्यांची रोख रक्कम तीन लाख ७५ हजार एवढी आहे. यात सर्वोकृष्ट लघूपटास १ लाख रूपये रोख, प्रशस्तीपत्रक सन्मान चिन्ह असे पारितोषिक असणार आहे. तर द्वितीय लघूपटास ७५ हजार रूपये रोख, प्रशस्तीपत्रक सन्मान चिन्ह, तृतीय लघूपटास ५० हजार रूपये रोख, प्रशस्तीपत्रक सन्मान चिन्ह व उत्तेजनार्थ २ लघूपटास प्रत्येकी २५ हजार अशी पारितोषिके देण्यात येणार आहेत. या शिवाय ५ लघूपटांना प्रत्येकी १० हजार तर १० लघूपटांना प्रत्येकी स्पर्धेसाठी ५ हजार विशेष पारितोषिके देण्यात येणार आहेत. याशिवाय दशकपूर्तीनिमित्त दहा पारितोषिके असणार आहेत.

लघूपट स्पर्धेसाठी २०सप्टेंबर २०२५पूर्वी नोंदणी करणे आवश्यक आहे. त्याकरिता shortfilmpmc@gmail.com या ईमेल आयडी वर संपर्क साधावा. या स्पर्धेसाठी जास्तीत जास्त स्पर्धकांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

|| Vidya Vinayen Shobhate ||
Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's
CHANGU KANA THAKUR
Arts, Commerce and Science College, New Panvel (Autonomous)
Accredited with A++ Grade by NAAC (4th Cycle-CGPA-3.52)
'College with Potential for Excellence' Status Awarded by University Grants Commission
'Best College Award' by University of Mumbai
PLACEMENT CELL
AND
INTERNAL QUALITY ASSURANCE CELL (IQAC)
Organize
Mega Job Fair 2025
5000+ Youth to Get Opportunities!
70+ Reputed Companies Participating
Date : 2nd August 2025 | Time : 9 :00 AM onwards
Venue : Changu Kana Thakur College, Khanda Colony, Panvel
: Companies Participating :
NO ENTRY FEES
• Dress Code- Professional or Business Casual Attire
• Multiple Copies of Resume and Photocopies of Required Documents
Mr. S. S. Kamble
Chairman
Placement Cell
Prof. (Dr.) B. D. Aghav
Coordinator
Internal Quality Assurance Cell
Prof. (Dr.) S. K. Patil
Principal
C. K. Thakur A. C. S. College
New Panvel (Autonomous)
Candidate
Registration QR Code

## संपादकीय

# पटावरची झुंजार राणी!

नागपूरच्या मराठमोळ्या दिव्या देशमुखने फिडे महिला विश्वचषक स्पर्धेत यशस्वी होत स्वत:ची अलौकिक गुणवत्ता तर सिद्ध केलीच पण सोबतच बुद्धिबळ विश्वातील भारताची मक्तेदारीही यामुळे जगासमोर आली आहे. दिव्याच्या भक्कम मानसिकतेने संपूर्ण स्पर्धेत लक्ष वेधून घेतले. विश्वचषक जिंकणारी दिव्या विश्वनाथन आनंदनंतरची दुसरी भारतीय असून ग्रँडमास्टर किताब पटकावणारी चौथी भारतीय महिला आहे.

**महाराष्ट्राची कन्या दिव्या देशमुखने बुद्धिबळ विश्वचषक स्पर्धेत भारताच्याच कोनेरू हम्पीला टायब्रेकरमध्ये हरवून सोमवारी विश्वचषक बुद्धिबळ स्पर्धेचे अजिंक्यपद पटकावले. ग्रँडमास्टर विश्वनाथन आनंदनंतर विश्वचषक जिंकणारी दिव्या ही पहिलीच भारतीय आहे. कारकीर्दीतील सर्वोच्च यश मिळवताना पहिल्यांदाच महिला विश्वचषक भारताकडे आणण्याची किमया दिव्याने केली. दिव्याचा जन्म २००५चा. वयाच्या अवघ्या १९व्या वर्षी महिला विश्वचषक जिंकणारी दिव्या आता भारतीय महिलांमध्ये चौथी आणि भारताच्या यादीतील ८८वी ग्रँडमास्टर झाली आहे. विश्वचषक बुद्धिबळ स्पर्धेची ही अंतिम फेरी जणु दोन पिढ्यांमधील लढत होती. या फेरीत जलदगतीने खेळल्या गेलेल्या टायब्रेकरमध्ये हम्पीची नेहमीची शैली दिसली नाही. नेहमी खंबीरपणे खेळणारी ३८ वर्षांची हम्पी यावेळी विचलित झालेली दिसली. दिव्याने हम्पीचा २.५-१.५ असा पराभव केला आणि २८ जुलै २०२५ या दिवशी दिव्या देशमुखच्या नावावर बुद्धिबळाचा विश्वचषक जिंकल्याची अजरामर कामगिरी नोंदली गेली. दिव्याची एकाग्रता आणि जिद्द पाहिलेल्या असंख्य नवोदितांना त्यातून नक्कीच प्रेरणा मिळेल. तिचे विजेतेपद महाराष्ट्रातीलच नव्हे तर अवघ्या देशभरातील अनेक मुलींना बुद्धिबळ खेळण्यासाठी प्रेरित करेल असे म्हटले जाते आहे. लहान वयातच मोठी संधी मिळालेल्या दिव्याने प्रयत्नपूर्वक स्वत:ला घडवले आहे. भक्कम मानसिकता ही तिची मोठी जमेची बाजू. जिंकल्यानंतर दिव्याने आपल्या आईला मारलेली घट्ट मिठी आणि तिने गदगदून ढाळलेले अश्रू अवघ्या जगाने पाहिले. दिव्याच्या यशात तिच्या आईचा सिंहाचा वाटा आहे. खेळाच्या प्रत्येक दौऱ्यात तिची आई तिच्या सोबत असते. दिव्याचे आईवडील दोघेही डॉक्टर आहेत. वडिलांना बुद्धिबळाची आवड असल्याने दिव्या बुद्धिबळाकडे वळली, पण स्त्रीरोगतज्ज्ञ असलेल्या तिच्या आईने मुलीच्या खेळातील कारकीर्दीसाठी आपल्या व्यवसायाचा त्याग केला. वयाच्या १६व्या वर्षी राष्ट्रीय महिला अजिंक्यपद मिळवून २०२३ मध्ये दिव्याने आशियाई महिला अजिंक्यपद मिळवले आणि तिचे आंतरराष्ट्रीय पटलावर आगमन झाले. विश्वचषक स्पर्धेतील दिव्याची कामगिरी अतिशय प्रेरणादायी अशीच म्हणावी लागेल. तिने अंतिम १६व्या फेरीत पाचव्या मानांकित चीनच्या झू जिनरचा पराभव केला. उपांत्यपूर्व फेरीत भारतीय हरिका द्रोणावल्लीला पराभूत केले तर उपांत्य फेरीत दिव्याने माजी जगज्जेती चीनची तान झोंगयी हिला नमविले. या साऱ्या सामन्यांमध्ये दिव्याचा आत्मविश्वास नजरेत भरणारा होता. जॉर्जियाच्या बटुमी येथे पार पडलेली ही स्पर्धा तब्बल २४ दिवस चालली. बुद्धिबळ विश्वातील भारताची मक्तेदारी या स्पर्धेने पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. गेल्या वर्षी भारताच्या दोम्माराजू गुकेशने विश्वविजेतेपद मिळवले होते. दिव्या आणि हम्पी या दोघीही आता जागतिक महिला विश्वविजेतेपदाच्या कँडिडेट्स स्पर्धेसाठी पात्र ठरल्या आहेत. महिला विश्वचषक जिंकणाऱ्या दिव्याला जगज्जेतेपदासोबतच ४२ लाख रूपयांचे पारितोषिक मिळाले तर उपविजेती हम्पी ३० लाख रुपयांच्या बक्षिसाची मानकरी ठरली. अवघ्या १९ वर्षांच्या दिव्याची ही अद्भुत कामगिरी देशातील तरुण पिढीला मार्गदर्शक व प्रेरित करणारी ठरावी.**

# वाघ केवळ शिकारी नव्हे, तर जैवशृंखलेचा श्वास!



भारतीय संस्कृतीत वाघ हे केवळ वन्य प्राणी नाही, तर सामर्थ्य, शौर्य आणि पर्यावरणीय संतुलनाचे प्रतीक मानले गेले आहे. देवी दुर्गेच्या वाहनापासून ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या तोफांवरील कोरीव वाघापर्यंत याचा प्रभाव स्पष्टपणे दिसतो. याच वाघाच्या संवर्धनासाठी दरवर्षी २९ जुलै रोजी जागतिक व्याघ्र दिन साजरा केला जातो – एक दिवस केवळ प्राण्यांसाठी नाही, तर आपल्याच संवेदना जागवणारा.

वाघ हा अन्नसाखळीतील सर्वोच्च शिकारी असला, तरी त्याचे अस्तित्व म्हणजे संपूर्ण जैवविविधतेचे आरोग्य. एक वाघ सुमारे ५० ते १०० चौ.किमी परिसर व्यापतो आणि त्या अधिवासातील अनेक प्रजाती, झाडे, जलस्त्रोत यांचे संरक्षणही नकळत घडते. म्हणूनच म्हटले जाते – वाघ वाचला, तर जंगल वाचेल आणि जंगल वाचले, तर माणसाचे आयुष्यही सुरक्षित राहील. एकेकाळी भारतात ४० हजार वाघ होते, परंतु अविचारी शिकारी व जंगलतोडीमुळे १९७२ पर्यंत केवळ १,४०० इतकी संख्या उरली. या घटलेल्या संख्येच्या पार्श्वभूमीवर 'प्रोजेक्ट टायगर' ही ऐतिहासिक मोहीम सुरू झाली आणि आज भारतात पुन्हा ३,१६७ वाघ अस्तित्वात आहेत – जगातील सर्वाधिक!

महाराष्ट्रातील वाघ संवर्धनात जळगाव जिल्ह्याचाही वाटा वाढतो आहे. विशेषतः यावल प्रादेशिक वनविभागात २०११ नंतर पुन्हा वाघ दाखल झाला. मेळघाटातून वाघ वाघदऱ्या, वढोदा रेंजमार्गे स्थलांतर करून यावलच्या जंगलात येतो, हे आता संशोधनातून सिद्ध झाले आहे. २०२४ मध्ये ट्रॅप कॅमेऱ्यात स्पष्टपणे वाघाचे दृश्य नोंदवले गेले. २०२५ मध्ये गौताळा-ऑट्रामघाट परिसरातही अशाच प्रकारच्या वाघाच्या उपस्थितीच्या बातम्या मिळाल्या. यावल विभागाचे सहाय्यक वनसंरक्षक समाधान पाटील यांच्या माहितीनुसार सध्या यावल परिसरात दोन वाघ ट्रांझिट अवस्थेत आहेत, तर मुक्ताईनगर भागात 'बनाना टायगर' म्हणून ओळखला जाणारा वाघ अधूनमधून दिसून येतो. त्याचप्रमाणे पाल जंगल सफारी मार्गावर वाघाच्या पावलांचे चिन्हही अलीकडेच आढळले आहेत आणि जंगल सफारी लवकरच सुरु होणार असल्याचे संकेत मिळाले आहेत.

या साऱ्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर, यावल प्रादेशिक वनविभागात १२ मे २०२४ रोजी बुद्ध पौर्णिमेच्या लख्ख चांदण्यात पार पडलेली वन्यप्राणी गणना ही एक वेगळाच अनुभव देणारी ठरली. यामध्ये चोपडा, वैजापूर, अडावद, देवझिरी, यावल (पूर्व-पश्चिम), आणि रावेर अशा सातही वनक्षेत्रात एकूण ३९ मचानींवर प्राणीगणना झाली. ८० निसर्गप्रेमींनी सहभाग घेतला आणि एकूण ५८४ वन्य प्राण्यांची नोंद झाली. यामध्ये निलगाय, चिंकारा, भेकर, सांबर, चौशिंगा, काळवीट यांसारखे शाकाहारी, तसेच बिबट, लांडगा, कोल्हा, रानमांजर, तरस, अस्वल यांसारखे शिकारी प्राणी दिसून आले. विशेष म्हणजे रावेर वनक्षेत्रात एक वाघ आणि चार बिबटांचे प्रत्यक्ष दर्शन झाले. हे सर्व प्राणी वाघाच्या नैसर्गिक अधिवासात सहअस्तित्व करणारे आहेत, म्हणूनच ही प्रजाती साखळी वाघाच्या अस्तित्वाला पूरक ठरते.

या संपूर्ण उपक्रमाचे यश हे केवळ वनविभागाचे नसून संपूर्ण जिल्ह्याचे आहे. जिल्हा प्रशासनाचे सहकार्य, निसर्गप्रेमींचा उत्साह, आणि श्रीमती निनू सोमराज (म. वनसंरक्षक), जमीर शेख (उपवनसंरक्षक), समाधान पाटील (सहायक वनसंरक्षक), तसेच चोख प्रशासन व मैदानातील वन अधिकारी व कर्मचाऱ्यांचे समन्वयाने हे शक्य झाले.

वाघ वाचवणे म्हणजे केवळ एक प्रजाती वाचवणे नव्हे, तर हवामान, पाणी, माती, जंगल आणि पर्यायाने आपलेच भविष्य सुरक्षित ठेवणे होय. म्हणूनच आपण सर्वांनी जंगलतोड रोखणे, शिकारीविरोधात आवाज उठवणे, पर्यावरण शिक्षण वाढवणे आणि जबाबदार पर्यटनाला प्रोत्साहन देणे या गोष्टींकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे.

आजच्या दिवशी, जागतिक व्याघ्र दिनाच्या निमित्ताने आपण संकल्प करूया –

वाघ वाचवा, जंगल वाचवा, जीवन वाचवा!

**–युवराज पाटील**
जिल्हा माहिती अधिकारी, जळगाव

# शास्त्रीय गायक वसंतराव देशपांडे

हिंदुस्तानी शास्त्रीय आणि उपशास्त्रीय संगीत क्षेत्रातील वसंतराव देशपांडे आघाडीचे गायक होते. त्यांना संगीत नाटक अकादमीने पुरस्कार देऊन गौरविले होते.

वसंतराव देशपांडे यांचा जन्म १९२० साली झाला. विदर्भातील एका देशस्थ ब्राह्मण कुटुंबात जन्मलेल्या वसंतरावांचे वडील श्रीमंत आणि जमीनदार होते. मात्र, वसंतराव लहान असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यानंतर वसंतरावांना घेऊन त्यांची आई सासरच्या घरातून बाहेर पडली. त्यांची काहीही चूक नसताना त्यांचा त्या घरातील हक्क नाकारण्यात आला.

वसंतराव लहान असतानाच सुप्रसिद्ध चित्रपट निर्माते आणि दिग्दर्शक भालजी पेंढारकरांनी त्यांच्यातील कलागुण हेरले. त्यांना १९३५ साली प्रदर्शित झालेल्या कालियामर्दन या हिंदी चित्रपटात कृष्णाची भूमिका मिळाली. त्यानंतर वसंतराव कलाकार म्हणून उदयास आले. पुढे अनेक गुरुंकडून त्यांनी संगीताचे मार्गदर्शन घेतले.



त्यांचे संगीताचे प्राथमिक शिक्षण नागपूरला शंकरराव सप्रे यांच्याकडे झाले. सप्रे ख्यातनाम शास्त्रीय गायक विष्णू दिगंबर पलुसकरांचे शिष्य होते. नंतरच्या काळात भेंडी बाजार घराण्याचे गायक अमान अली खान आणि अंजनीबाई मालपेकर, किराणा घराण्याचे गायक सुरेशबाबू माने, पतियाळा घराण्याचे असद अली खान आणि ग्वाल्हेर घराण्याचे रामकृष्णबुवा वझे अशा मातब्बर गायकांकडे त्यांना शिकायला मिळाले. मात्र, दीनानाथ मंगेशकरांच्या गायकीचा वसंतरावांच्या गाण्यावर मोठा प्रभाव होता. नामवंत दीनानाथ मराठी नाट्य कलाकार, नाट्य संगीत दिग्दर्शक आणि हिंदुस्तानी शास्त्रीय संगीतातील मोठे नाव होते.

वसंतरावांना मंगेशकरांच्या गायकीचे खरे आणि एकमेव वारसदार मानले जात असले, तरी वसंतरावांचा नक्कल करण्यास विरोध होता. शास्त्रीय आणि उपशास्त्रीय संगीतात त्यांनी दाखवलेली प्रतिभा अजोड होती. गायनाबरोबरच ते उत्तम तबलावादक व पेटीवादकही होते. सरगम ही त्यांची एक विशेष खासियत होती. त्यांनी राज कल्याण हा राग तयार केला. हा एक यमन रागाचा प्रकार असून, यामध्ये पंचम वर्ज्य आहे. हिंदुस्तानी शास्त्रीय गायनातील ठुमरी, दादरा, गझल या प्रकारांवरही त्यांची हुकमत होती. लाहोरमध्ये शिक्षण घेत असताना ते ऊर्दू भाषा शिकले, त्याचा त्यांना गझल गायनासाठी उपयोग झाला. त्यांचे ३० जुलै १९८३ रोजी पुण्यात निधन झाले. सौजन्य: टाटा टेक्नॉलॉजीस

## बदलते तंत्रज्ञान



# आधार कार्ड आता तुमच्या डिजिटल ओळखीचा भाग

दररोज, कोट्यवधी लोक आधारद्वारे ई-केवायसी, सबसिडी, बँकिंग आणि सरकारी सेवांचा लाभ घेत आहेत. तथापि, आधार कार्डशी संबंधित फसवणुकीच्या बातम्या देखील सतत येत असतात.



हे धोके कमी करण्यासाठी आणि नागरिकांची ओळख अधिक सुरक्षित आणि विश्वासार्ह बनवण्यासाठी, भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाने एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.आता आधारमध्ये समाविष्ट असलेला सुरक्षित **क्युआर** कोड अपडेट करण्यात आला आहे. या नवीन बदलाद्वारे, आधार क्रमांक न उघडताही एखाद्या व्यक्तीची ओळख पडताळता येते.

आधार कार्डमध्ये एक नवीन सुरक्षित **क्युआर** कोड समाविष्ट केला आहे, ज्यामध्ये आता तुमची लोकसंख्याशास्त्रीय माहिती जसे की नाव, पत्ता, जन्मतारीख आणि लिंग तसेच तुमचा फोटो असेल. हा **क्युआर** कोड युआयडीएआय

द्वारे डिजिटल स्वाक्षरी केलेला आहे, ज्यामुळे तो सुरक्षित आणि छेडछाड-प्रतिरोधक बनतो. म्हणजेच, कोणीही या **क्युआर** कोडमध्ये बदल किंवा छेडछाड करू शकत नाही. हे ओळखीची अचूकता आणि सुरक्षितता दोन्ही सुनिश्चित करते.

तुम्हाला नवीन सुरक्षित **क्युआर** कोड ई-आधार, पीव्हीसी आधार कार्ड आणि युआयडीएआय

वेबसाइटवरून डाउनलोड केलेल्या नवीन आधार फॉरमॅटमध्ये मिळेल. जुन्या आधार कार्डमध्ये ही सुविधा नव्हती, परंतु आता तुम्ही णखऊ-ख पोर्टलवरून नवीन आधार डाउनलोड करून या **क्युआर** कोडचा लाभ घेऊ शकता. हा अपडेट केलेला **क्युआर** कोड ओळख पडताळणी अधिक सुरक्षित आणि विश्वासार्ह बनवतो.

आधारचा नवीन सुरक्षित **क्युआर** कोड तुमची ओळख पूर्वीपेक्षा अधिक सुरक्षित, सोपी आणि विश्वासार्ह बनवतो. त्याचे अनेक फायदे आहेत. तुम्ही ते युआयडीएआय च्या मोबाईल ॲपने किंवा विशेष **क्युआर** स्कॅनरने स्कॅन करा. **क्युआर** कोड स्कॅन होताच, तुमचा फोटो आणि त्यात असलेली इतर माहिती लगेच उघड होते. ही माहिती युआयडीएआयच्या डिजिटल स्वाक्षरीने त्वरित सत्यापित केली जाते, ज्यामुळे हे सिद्ध होते की ही माहिती खरी आहे आणि कोणीही त्यात छेडछाड केलेली नाही.

# लोकप्रिय पार्श्वगायक सोनू निगम

सोनू निगम हे हिंदी चित्रपटसृष्टीतील एक लोकप्रिय पार्श्वगायक आहे. सोनू निगमचा जन्म ३० जुलै १९७३ रोजी फरिदाबाद, हरयाणा येथे झाला. चित्रपटांसोबतच त्याने स्वतःचे स्वतंत्र अल्बमही केले आहेत. सचिन पिळगावकर यांच्या एका मराठी चित्रपटात त्याने गाणे व पाहुण्या कलाकाराची भूमिका केली होती. काही हिंदी चित्रपटांत त्यांनी नायकाच्या भूमिकाही केल्या आहेत, पण तो प्रयत्न मात्र फारसा यशस्वी ठरला नाही. सोनू निगम यांनी उत्तर अमेरिका, युरोप, मध्य पूर्व आफ्रिका, आशिया आणि ऑस्ट्रेलिया या देशांमध्ये कामगिरी बजावली आहेळे त्याने आपल्या नावाचे स्पेलिंग 'Nigam' ऐवजी 'Niigaam' असे बदलले होते, पण अधिक भरभराटीचे कोणतेही चिन्ह न दिसल्यामुळे स्पेलिंग परत पूर्ववत केले.



## निमित्त

त्यांचे मुंबईतले सुरुवातीचे वास्तव्य धडपडीचे होते. टी-सीरीज कंपनीचे मालक यांनी त्यांना संधी दिली, पण त्यातही त्यांना मोहम्मद रफीचीच गाणी गाण्यासाठी मिळाली. त्यामुळे बऱ्याच लोकांपर्यंत आपला आवाज पोहचवूनही त्यांच्यावर बऱ्याच जणांनी ते रफीची नक्कल करीत असल्याचा शिक्का मारला. १९९०मध्ये त्यांनी जानम चित्रपटासाठी पहिले गाणे गायले, पण काही कारणास्तव तो चित्रपट बंद पडला. दरम्यान, त्यांनी आकाशवाणीवरच्या जाहिरातींना आवाज दिला. नंतर झी वाहिनीच्या सा रे ग म या कार्यक्रमाने त्यांना ओळख दिली. मग त्यांनी मागे वळून पाहिले नाही. बेवफा सनम चित्रपटातले त्याचे 'अच्छा सिला दिया तूने' हे गाणे तुफान गाजले आणि पार्श्वगायक म्हणून स्थिरावण्याची संधी त्याला मिळाली.

सोनूने सा रे ग म मध्ये सूत्रधाराची भूमिका केल्यानंतर त्यांना अधिकाधिक गाणी मिळू लागली. १९९७च्या बॉर्डर चित्रपटातले संदेसे आते है हे त्यांचे गाणे सुपरहिट झाले. त्यानंतर त्याच वर्षी परदेस चित्रपटातले ये दिल दिवाना हे गाणे त्याला रफीच्या नकलेचा शिक्का पुसण्यास कामी आले. त्यानंतर त्याची स्वतंत्र शैली सर्वांनीच मान्य केली, तसेच रोल मॉडेल म्हणूनही तो गणला जाऊ लागला. गाण्यात भावना व्यक्त करणे, आवाजांचा पोत बदलणे यामुळे त्याला महान गायकांच्या श्रेणीत बसायला फार वेळ लागला नाही.

हिंदीप्रमाणेच सोनूने बंगाली, उडिया, कानडी, पंजाबी, तामिळ, तेलुगू, इंग्रजी, भोजपुरी, ऊर्दू, नेपाळी, मराठी या भाषांतही गाणी म्हटली आहेत. सोनूने संगीताचे शिक्षण उस्ताद गुलाम मुस्तफा खान यांच्याकडून घेतले.

सोनूच्या पत्नीचे नाव मधुरिमा असून २००२मध्ये या दोघांचे लग्न झाले. या दाम्पत्याला एक मुलगा असून त्याचे नाव नवीन आहे. २०११मध्ये धनुषने गायलेले 'व्हाय धीस कोलावरी डी' या गाण्याच्या चाइल्ड व्हर्जन नवीनने गायले होते.

सोनू निगमची आई शोभा यांचे फेब्रुवारी २०१३ मध्ये निधन झाले. 'सिंह साहब दी ग्रेट' (२०१३) या सिनेमातील शीर्षक गीत तीशा निगमने गायले होते. या सिनेमाद्वारे तिने आपल्या करिअरला सुरुवात केली. तर निकिताने २००६मध्ये 'प्यारे मोहन' या सिनेमात आपल्या करिअरमधील पहिले गाणे गायले होते. या गाण्याचे बोल होते, 'रब्बा दे दे जवानी'. या गाण्यात तिच्यासह सुनिधी चौहानेसुद्धा स्वरसाज चढवला होता.

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# रात्री की सकाळी? दूध पिण्याची योग्य वेळ कोणती?

दूध आपल्या आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर आहे. दूध हे एक सुपरफूड आहे. दुधात भरपूर पोषक घटक असतात. ज्यामध्ये कॅल्शियम, प्रथिने आणि निरोगी चरबी यांसारखे आवश्यक बहु-पोषक घटक आढळतात. दूध प्यायल्याने हाडे मजबूत होतात. याशिवाय स्नायू ही मजबूत होतात, शरीर सक्रिय राहते आणि मनही तीक्ष्ण होते. व्हिटॅमिन डी मेंदूचे कार्य सुधारते. पण असं असतानाअनेकांच्या मनात हा प्रश्न येतो की ते सकाळी रिकाम्या पोटी दूध पिऊ शकतात का? चला तर मग जाणून घेऊया दूध पिण्याची योग्य वेळ कोणती? तुम्ही सकाळी दूध प्यावे की रात्री ही तुमची वैयक्तिक निवड असू शकते. पण सकाळी रिकाम्या पोटी दूध पिणे हे व्यक्तीच्या आरोग्याच्या स्थितीवर आणि दुधाच्या प्रकारावर देखील अवलंबून असते.



**सकाळी दूध पिण्याचे फायदे**

सकाळी दूध प्यायल्याने तुमची पचनक्रिया सुधारते. सकाळी दूध प्यायल्याने कमकुवत हाडांना जीवदान मिळते आणि स्नायू मजबूत होतात. ज्यांना वजन वाढवायचे आहे त्यांनी सकाळी दूध जरूर प्यावे.

**सकाळी दूध पिण्याचे तोटे**

काही लोकांना दुधापासून लॅक्टोजची समस्या असू शकते, ज्यामुळे पोटदुखी, अतिसार किंवा गॅस होऊ शकतो. रिकाम्या पोटी दूध प्यायल्याने सिडीटी किंवा पोटात जळजळ होऊ शकते. ज्या लोकांना रिकाम्या पोटी दूध प्यायचे आहे त्यांनी गरम दुधाऐवजी थंड दूध प्यावे जेणेकरुन पचनसंस्था आणि सिडिटीशी संबंधित समस्या उद्भवणार नाहीत.

**दूध पिण्याची योग्य वेळ आणि पद्धत कोणती?**

तुम्ही सकाळी दूध पिऊ शकता पण ते पिण्यापूर्वी काही फळे किंवा नाश्ता करा. दूध कधीही रिकाम्या पोटी पिऊ नका, ते जेवणासोबत प्या. कमी चरबीयुक्त किंवा स्किम्ड दूध पिणे चांगले आहे, विशेषतः जर तुम्हाला वजन कमी करायचे असेल किंवा हृदयाच्या आरोग्याची काळजी असेल. रात्री झोपण्यापूर्वी दूध पिणे देखील फायदेशीर ठरू शकते, कारण यामुळे झोप सुधारण्यास मदत होते. तसेच गरम दूध हळद मिसळून प्या. जर पचनाच्या समस्या असतील तर रात्री दूध पिऊ नका.

# रोहा-तांबडी रस्ता पुन्हा संकटात! डोंगर सरकतोय

## मोठे दगड झाडांसह रस्त्यावर येण्याचा धोका

**धाटाव : प्रतिनिधी**

मुख्य जिल्हा मार्ग क्रमांक ५० वरील रोहा-तांबडी हा डोंगराळ व चढणीचा रस्ता सध्या गंभीर धोक्याच्या छायेत आहे. मागील आठवड्यात पावसामुळे सात ते आठ ठिकाणी माती सरकली असून, मोठे दगड व झाडं डोंगर उतारावरून रस्त्यावर येण्याच्या स्थितीत आहेत. अशा परिस्थितीत पाऊस जोरदार पडत आहेच परंतु आणखी पावसाचा जोर वाढला, तर वाहतूक पूर्णपणे बंद होण्याचा आणि जीवितहानी होण्याचा धोका वाढला आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागा व लोकप्रतिनिधी त्याने तात्काळ लक्ष देऊन तातडीने उपाययोजना कराव्यात अशी मागणी देखील प्रवासी व वाहतूकदारांनी केलेले आहे .

हा रस्ता अनेक गावांना जोडणारा प्रमुख दुवा असल्यामुळे प्रवाशांसाठी अत्यावश्यक आहे. हा जो जोड रस्ता रोहा मुरुड , तळा तसेच तांबडी ,बाराशेत ,म्हसाडी ,सवाणे व वाली अशा गावांचा रस्ता आहे . परंतु रोहा हनुमान टेकडी पासून चढणीचा भाग असल्याने वाहने आधीच अडथळ्याने जात आहेत. याशिवाय, रात्रीच्या वेळी या मार्गावर कोणतीही प्रकाश व्यवस्था नसल्याने अपघाताची शक्यता आणखी वाढते. यामुळे प्रवासी वर्ग व वाहतूकदारांकडून प्रशासनाकडे तात्काळ स्थायी उपाययोजनांची जोरदार मागणी केली जात आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्यालगत स्लोप स्टॅबिलायझेशन, संरक्षक भिंती, चेतावणी फलक अशी मागणी होत असून लोकप्रतिनिधींनीही या गंभीर विषयाकडे दुर्लक्ष न करता लक्ष देणे गरजेचे आहे. धोका स्पष्टपणे समोर दिसत असताना, उपाययोजना न होणे म्हणजे शेवटी एखाद्या दुर्घटनेची वाट पाहणं, असा संतप्त सूर आता नागरिक, प्रवासी आणि वाहनचालकांमध्ये मनात साशंकता येऊ लागलेली आहे.



# कर्जतच्या रिसॉर्टमध्ये शॉक लागून नालासोपाऱ्यातील युवकाचा मृत्यू

**कर्जत : प्रतिनिधी**

मुंबई नालासोपारा येथून आलेल्या युवकाचा कर्जत येथील साई लीला रिसॉर्टवर शॉक लागल्याने मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. अठरा वर्षीय कवीन पारकर असे मयत झालेल्या तरुणाचे नाव असून तो आपल्या अन्य मित्रांच्या सोबत रिसॉर्टवर मौजमजा करण्यासाठी आला होता. मात्र रिसॉर्टवर कवीनच्या हाताला विद्युत प्रवाहाचा शॉक लागल्याने त्याचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला.

रविवारी विकेंड सुट्टी एन्जॉय करण्यासाठी मुंबईतील नालासोपारा, लोवरपरेल,घाटकोपर अशा विविध ठिकाणी राहणारे सात कॉलेज युवक युवतींचा ग्रुप कर्जतमध्ये आला होता. तालुक्यातील कडाव टाटा पॉवरकॅम्प भिवपुरी परिसरातील साई लीला या रिसॉर्टवर हे तरुण मुक्कामाला आले होते. त्यांच्या ग्रुपमध्ये दोन मुली होत्या. सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास रिसॉर्टवर पोहचल्या नंतर सर्वजण फ्रेश होउन साडेसहाच्या सुमारास रिसॉर्टच्या परिसरात मजा करीत होते.

यातील नालासोपारा येथील राहणाऱ्या कवीन पारकर या युवकाचा रिसॉर्टवर असलेल्या लोखंडी पाळण्याच्या ठिकाणी हात लागल्याने विजेचा झटका बसला. आणि तो बेशुध पडला त्यामुळे घाबरून गेलेल्या मित्रांनी त्याला कर्जत भिवपुरी येथील रायगड हॉस्पिटल येथे आपल्या मित्राला दाखल केले होते परंतु येथील डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले आहे. मृतदेहाचे नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्र येथे शवविच्छेदन करण्यात आले. असुन अधिक तपास कर्जत पोलिस करीत आहेत.

# रायगड जिल्ह्यात नागपंचमी उत्साहात


**अलिबाग : प्रतिनिधी**

श्रावण महिन्यातील पहिलाच सण अशी ओळख असलेला नागपंचमीचा सण रायगड जिल्हयात मोठया उत्साह आणि भावपूर्ण वातावरणात साजरा झाला. आवास येथील प्रसिदध श्री नागेश्वर मंदिरात दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती. .

घरोघरी गोमेटी या वेलीचे तसेच बाजारातून पीओपी पासूनच्या तयार केलेल्या नागाची पुजा गृहीणी मोठ्या उत्साहाने करण्यात आली.सकाळ पासून घरामध्ये मांगल्याचं वातावरण निर्माण झाले होते .विशेष म्हणजे या महिन्यात मांसाहारी वर्ज्य असल्यामुळे संपूर्ण महिना गोड - धोड पदार्थांची मेजवानी होती . या सणाच्या निमित्ताने महिलांनी नाग देवतेला जगू द्या,त्यांची हत्या करु नका त्याच बरोबर आपल्यावर आलेले संकट हद्दपार होण्यासाठी प्रार्थना केली.

अलिबागच्या आवास येथील श्री नागेश्वर मंदिरात सकाळी पूजाअर्चा पार पडली. नागेश्वराच्या मूर्तीवर दुग्धाभिषेक सुरू होता. तालुक्यातील विवीधभागातून आलेल्या भाविकांनी मंदीरात दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती.

# गावगाड्याची दळणवळण व्यवस्था सांभाळतेय 'लाल परी'



**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुका डोंगराळ दुर्गम भाग असून तालुक्यातील गावागावा पर्यंत रस्ते पोहचले असून ग्रामीण भागात गावांपर्यंत लाल परी पोहचली आहे.ही लालपरी गावागावासाठी दळणवळणाचे महत्वाचे साधन बनले आहे.

तालुक्यातील तळेगाव,भानंग,गौळवाडी,महागाव, म्हसाडी, निगुडशेत, गिरणे, रहाटाड, मालुक,रोवळे,वाशीहवेली,मजगाव, वांजलोशी,गणेशनगर,इत्यादी भागात लालपरीची सेवा सुरू आहे.या लालपरीच्यासेवेमुळे येथील नागरिकांना तळा, माणगाव,व शहराकडे जाण्यास सोपे होत आहे.यामुळे ही लालपरीची सेवा असल्याने अर्थिक फायदाही ग्रामीण व डोंगरी भागातील नागरिकांना व शेतकऱ्यांना, विद्यार्थ्यांना होताना दिसत आहे.

ग्रामीण भागात जर का खाजगी वाहनाने प्रवास करणे अथवा सामान न्यावयाचे झाल्यास दुप्पट खर्च हाते.यामुळे लालपरीचा प्रवास आम्हाला चांगले आहे.असे नागरिकांशी संपर्क साधला असता म्हटले.सध्या इंदापूर -तळा एस टी ची सटेल सेवा सुरू आहे.तसेच ग्रामीण भागातही एस टी पोहचल्याने यांचा चांगला लाभ होत आहे.

इंदापूरहून शेवटची तळ्याकडे येणारी शेवटची गाडी ही ७ वाजून १० मिनिटांची आहे.ती गाडी आठ वाजताची व्हावी अशी अपेक्षा प्रवासी वर्गातून होत आहे.तसेच पुणे व नालासोपारा गाडी चालू होण्याची मागणी होत आहे.तळा बसस्थानकाचे काम चालू असल्याने प्रवाशांतून समाधान व्यक्त होत आहे.अर्थिकदृष्ट्याही सध्याच्या परिस्थितीत समाधानकारक उत्पन्न मिळत आहे.

**एस टी.सेवा आमच्यासाठी लाभदायक असून आम्हां महीलांना अर्धा तिकीट असल्यामुळे आमचे आर्थिक नुकसान होत नाही. आमच्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सुध्दा एस टी वेळेत असल्यामुळे त्याच्याही वेळेची बचत होते.ग्रामीण भागात एस टी आमच्यासाठी दळणवळणाचे चांगले साधन आहे.**

**-कल्पना घाडगे**, रोवळा संरक्षक


**अलिबाग नगरपरिषद**
**जाहीर सूचना**

अलिबाग नगरपरिषदेकारिता खालील प्रमाणे इच्छुक उमेदवारांद्वारे ऑफलाईन पद्धतीने दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचा तपशील | कालावधी |
|---|---|---|
| १ | अलिबाग नगरपरिषद करिता स्वच्छ महाराष्ट्र मिशन (ना.) २.० व माझी वसुंधरा अभियान ६.० अंतर्गत पर्यावरण पूरक सण साजरे करणे करिता साहित्य खरेदी. | दि.३०.०७.२०२५ ते ०७.०८२०२५ पर्यंत राहील. वेळ: सायंकाळी ४.०० पर्यंत |
| २ | अलिबाग नगरपरिषद करिता स्वच्छ महाराष्ट्र मिशन (ना.) २.० व माझी वसुंधरा अभियान ६.० अंतर्गत 'पर्यावरणपूरक गणेशोत्सव स्पर्धा २०२५' आयोजनासाठी दरपत्रक मागविणे बाबत. | दि. ३०.०७.२०२५ ते ०७.०८.२०२५ पर्यंत राहील. वेळ: सायंकाळी ४.०० पर्यंत |

सदर विषयी अधिक माहिती अलिबाग नगरपरिषद आरोग्य विभाग येथे उपलब्ध आहे.

सही/-
मुख्याधिकारी
अलिबाग नगरपरिषद


# स्वामी समर्थ साधना केंद्रात उपलब्ध होणार रास्तभावाने भोजन व उपाहार

## शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांना पन्नास टक्के सूट

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन तालुक्यातील वडघर पांगलोली या ठिकाणी असलेल्या स्वामी समर्थ साधना केंद्रामध्ये लवकरच रास्त भावामध्ये भोजन उपलब्ध करून देण्यात येणार आहे. रास्त भाव भोजनामध्ये पोटभर खिचडी, कढी असा मेनू असणार आहे. स्वामी समर्थांच्या अतिशय आवडीचा पदार्थ हा कढी, खिचडी असल्यामुळे फक्त पन्नास रुपयांमध्ये हे भोजन स्वामी समर्थ साधना केंद्रामध्ये लवकरच सुरू करण्यात येणार आहे. विशेष बाब म्हणजे यामध्ये शासकीय व निमशासकीय कर्मचाऱ्यांना पन्नास टक्के सूट दिली जाणार आहे.



सकाळच्या वेळेत उपाहारासाठी फक्त वीस रुपयांमध्ये इडली, वडा, डोसा, उपमा, शिरा इत्यादी पदार्थ देखील उपलब्ध राहणार आहेत. मात्र उपाहाराच्या पदार्थांमध्ये सूट मिळणार नाही. निमशासकीय कर्मचारी, महावितरण, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळ,यांना सुध्दा सवलतीचा लाभ मिळणार आहे. सवलती साठी आपले ओळखपत्र दाखविणे अनिवार्य असणार आहे.

स्वामी समर्थ साधना केंद्राचे संस्थापक दीपक तथा काका जोशी यांच्या उपस्थितीत पुणे या ठिकाणी नुकतीच काही उद्योगपती, दानशूर व्यक्ती, पर्यटन क्षेत्राशी निगडित घटक, यांची बैठक घेण्यात आली. या बैठकीमध्ये रास्त दरात भोजन व खाद्यपदार्थ उपलब्ध करून देण्याबाबत निर्णय झाला. यासाठी काही देणगीदार देखील तयार झाले आहेत. रास्त भाव भोजन केंद्र व उपाहार केंद्र चालविण्यासाठी लवकरच स्थानिक स्वामी भक्तांची एक समिती गठित करण्यात येणार आहे, यामध्ये सुनील उमरोटकर गुरुजी, योगेंद्र गिरी महाराज, किरण कोरडे, जितेंद्र बोरकर, प्रीतम भाटकर, संतोष चौकर यांना समाविष्ट करणार असल्याची माहिती दीपक तथा काका जोशी यांनी दिली आहे.

या ठिकाणी दत्त जयंती, स्वामी समर्थ जयंती, गुरुपौर्णिमा इत्यादी उत्सव मोठ्या उत्साहाने साजरे केले जातात. या ठिकाणी असलेले नक्षत्र राशी वन, तसेच हेलिंग थेरेपी (वैश्विक ऊर्जा) द्वारे वाढवण्यात आलेली विविध फळझाडे व फुलझाडे हे पाहण्यासाठी अनेक भाविक व त्या विषयावर अभ्यास करणारे तज्ञ देखील वेळोवेळी या ठिकाणी येत असतात. या ठिकाणी स्थानिकांना रोजगार देखील उपलब्ध होणार आहे.

# तळा तालुक्यात नागपंचमी उत्साहात साजरी

**तळा :** तालुक्यात नागपंचमी घरोघरी व काही ठिकाणी महिला एकत्र येत नाग देवतेची मोठ्या आध्यात्मिक पध्दतीने पूजा करत नागपंचमी सण मोठ्या उत्साहात साजरा केल्याचे पहावयास मिळाले आहे. नागपंचमी हा श्रावण मासातील प्रथम येणारा सण आहे.तालुक्यात महिला वर्गाची आदल्या दिवसापासून नागपूजेचे साहित्य गोळा करत होत्या.नागपंचमीच्या दिवशी सकाळी पाटावरती नागाची मातीची मुर्ती किंवा जंगलातून वेल आणून तीची भक्तिभावाने पूजन केली जाते.अशा प्रकारे आधुनिक युगात पारंपारिक पध्दतीने हा सण साजरा केला जात आहे.



साप हा शेतकऱ्यांचा मित्र आहे.त्याचे रक्षण करणे हे पर्यावरणाच्या दृष्टीने आवश्यक आहे.आशा प्रकारची भावना नागरिकांच्या मनात या दिवशी रूजणे आवश्यक आहे.


**सहनिबंधक सहकारी संस्था (सिडको)**
**यांचे कार्यालय**
शहर व औद्योगिक विकास महामंडळ, (महाराष्ट्र) मर्यादीत
बेलापुर रेल्वेस्टेशन कॉम्प्लेक्स, टॉवर नं.०८, पाचवा मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई
ई-मेल : jointregcidco@gmail.com

जा.क्र.सनि/ससं/ सिडको/८९१/२०२५ दिनांक :-२९/०७/२०२५

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत अधिनियम १९६३ चे कलम ११ (२) व नियम (२) अन्वये जाहीर नोटीस अर्ज क्रमांक १४८९/२०२५**

चेअरमन/सेक्रेटरी/खजिनदार,
हावरेज स्प्लेंडर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.,
भुखंड क्र.५२ व ५६, सेक्टर-२०,
खारघर, नवीमुंबई. — अर्जदार

**विरुध्द**

०१) मे. हावरे कंन्स्ट्रक्शन प्रा.लि.
पत्ता:- ४१३ ते ४१६, वर्धमान मार्केट, सेक्टर-१७
वाशी, नवीमुंबई.

०२) मा. व्यवस्थापक (शहर सेवा-२)
सिडको लि, सिडको भवन, पाहिला मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई. — जाब देणार

हावरेज स्प्लेंडर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., भुखंड क्र. ५२ व ५६, सेक्टर-२०, खारघर, नवीमुंबई. या संस्थेचा महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत अधिनियम १९६३ चे कलम ११ (२) व नियम (२) बाबतचा अर्ज दिनांक ०७/०७/२०२५ रोजी या कार्यालयात प्राप्त झालेला आहे. प्राप्त प्रस्तावाचे अनुषंगाने आयोजित केलेल्या सुनावणीस अर्जदार, प्रतिवादी गैरहजर राहिले आहेत. सबब पुनश्च सुनावणी आयोजित करण्यांत येत आहे.

१) अर्जदार यांनी अर्ज व त्यासोबतची आवश्यक ती कागदपत्रे जाब देणार यांना सुनावणीपुर्वी द्यावी.
२) 'जाब देणार तसेच इतर अशा व्यक्ती ज्यांचे हक्क बाधित होणार आहेत/ज्यांची हरकत आहे त्यांनी त्यांच्या बचावासाठी व्यक्तीशः किंवा त्यांच्या वकीलांमार्फत अथवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधी मार्फत सक्षम प्राधिकारी यांचे कार्यालयात सुनावणीपुर्वी लेखी उत्तर सादर करावे,
३) आपणाकडून प्राप्त झालेले लेखी उत्तर विचारात घेवून प्रकरणातील सुनावणी दिनांक ११/०८/२०२५ रोजी सकाळी/दुपारी ०३.०० वाजता निश्चित करण्यात येत आहे.
४) आपण व्यक्तीशः अथवा यथोचितरित्या नियुक्त केलेल्या प्रतिनिधीमार्फत उत्तर दाखल केले नाही किंवा वरील दिनांकास उपस्थित राहिला नाही तर सदर प्रकरणाची सुनावणी घेवून उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी,
५) आपणास सुनावणीचे वेळी पुर्वी १० मिनिटे अगोदर प्रवेश दिला जाईल. सुनावणी वेळेनंतर प्रवेश दिला जाणार नाही व सुनावणीस आपण गैरहजर आहात असे गृहीत धरण्यात येईल.
६) सुनावणीच्या वेळी एका पक्षकाराच्यावतीने जास्तीत जास्त दोन व्यक्तींना प्रवेश दिला जाईल.
७) सदर प्रकरणी मयत पक्षकारांचे वतीने त्यांचे वारसास पक्षकार म्हणून समाविष्ठ करणेत यांवे

सही/-
(राजेंद्र वीर)
सक्षम प्राधिकारी मोफा अधिनियम १९६३ तथा सहनिबंधक, सहकारी संस्था, सिडको, नवी मुंबई.



**PANVEL MUNICIPAL CORPORATION**
**TENDER NOTICE-SECOND CALL**
**Tender No: PMC/CE/PMAY/52/2025-26**
**CITY ENGINEER'S OFFICE (PMAY DEPARTMENT)**

**INVITATION OF TENDER FOR THE WORKS OF** "Mixed Use Development under PMAY with Rehabilitation Of Slum Dwellers Of Plot No. 307A At. Panvel, Shivajinagar, Dist. Raigad, Maharashtra 410206"

Offers by way of e-tendering (Lump Sum PPP form) are invited by the Commissioner, Panvel Municipal Corporation from contractors in e-tendering system for following

| Name of work | Amount of E.M.D (Rs) | Time limit in Calendar months | Cost of Tender Document(Rs.) |
|---|---|---|---|
| Mixed Use Development under PMAY with Rehabilitation Of Slum Dwellers Of Plot No. 307A At. Panvel, Shivajinagar, Dist. Raigad, Maharashtra 410206 | Rs. 12,50,000/- | 36 Months (Including Monsoon) | Rs.5,000/- +18% GST Total Rs.5900/- (Non refundable) |

The details of above works, such as Security Deposit, Earnest Money Deposit, Terms & Conditions of the Tender are available on website www.mahatenders.gov.in Tenders for these works are to be submitted by e-tendering system. Bidders can avail the e-tender document from **30/07/2025 from 5.00 P.M. to 07/08/2025 up to 5.00 PM.** Bidders should submit their offer by way of e-tendering system only. The last date of Submission by way of e-tendering will be **08/08/2025 up to 3.00 PM**. Commissioner, Panvel Municipal Corporation reserves the right to accept or reject any or all tender without giving any reason there of

जा.क्र. पमपा/ जनसंपर्क./३१२५/
प्र.क्र.३६८/३७/२०२५
दिनांक :- २९/०७/२०२५

**sd/-**
**Additional Commissioner-I**
**Panvel Municipal Corporation,**
**Panvel-410 206**

# नवी मुंबईत सर्वत्र स्वच्छता मोहीम

**नवी मुंबई : बातमीदार**

दैनंदिन सफाई करण्यात येत असलेल्या जागांव्यतिरिक्त 'सफाई अपनाओ बिमारी भगाओ' अभियानांतर्गत दुर्लक्षित जागांच्या स्वच्छतेकडेही बारकाईने लक्ष दिले जात असून आज आठही विभागात गृहनिर्माण संस्था, वसाहती व प्रामुख्याने त्यामागील गल्ल्यांमध्ये सफाईची विशेष मोहीम राबविण्यात आली.



या अंतर्गत नेरूळ विभागात से.२५ येथील सफल पार्क सोसायटी याठिकाणी अंतर्गत परिसर व पाठीमागील गल्ल्या यांची सखोल स्वच्छता करण्यात आली. त्याचप्रमाणे वाशी विभागातही नाखवा चौक वाशी गाव येथील वसाहतींचा परिसर आणि ग्रेन मर्चंट सोसायटी सेक्टर १७ वाशी परिसर व बॅकलेन या ठिकाणी सफाई मोहीम राबविण्यात आली.

तुर्भे विभागात मिलीनिअम टॉवर, सेक्टर ९ सानपाडा आणि प्रभू आशिष सोसायटी सेक्टर २६ याठिकाणी सखोल स्वच्छता मोहीमेचे आयोजन करण्यात आले होते. तसेच कोपरखैरणे विभागातील सोसायटी व रहिवासी भागातही सफाई करण्यात आली.

घणसोली विभागात सेक्टर ६ प्रोग्रेसिव्ह सोसायटी परिसरात व बॅकलेनमध्ये सखोल स्वच्छता करण्यात आली. ऐरोली विभागातही अय्यप्पा मंदिरा शेजारी सेक्टर १४ परिसरातील सोसायट्यांच्या भागात व मागील गल्ल्यांमध्ये सफाई मोहीम राबविण्यात आली.

सर्व ठिकाणच्या मोहीमांमध्ये नमुंमपा अधिकारी, कर्मचारी व स्वच्छता मित्र व स्वच्छता सखी यांच्या समवेत स्थानिक नागरिकांनीही उत्साहाने सहभाग घेतला. आपण आपल्या परिसराचे व शहराचेही देणे लागतो या भावनेतून नागरिकांनी सामाजिक बांधिलकी जपत या मोहीमांमध्ये सहभाग घेतला. या वेळी स्वच्छतेची शपथ घेण्यात आली. त्याचप्रमाणे उघड्यावर कचरा टाकू नये, कचऱ्याचे घरातच वर्गीकरण करावे व वेगवेगळा ठेवलेला कचरा महानगरपालिकेच्या घंटागाडीतही वेगवेगळा द्यावा अशाप्रकारे सोसायटी वसाहतीमधील नागरिकांशी सुसंवाद साधून जनजागृती करण्यात आली.

बेलापूर विभागात १२ व्यावसायिक व नागरिकांवर सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकून अस्वच्छता करीत असल्याचे निर्देशनास आल्याने दंडात्मक कारवाई करण्यात आली. 'सफाई अपनाओ, बिमारी भगाओ' या अभियानांतर्गत महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली १ जुलैपासून दररोज स्वच्छता व आरोग्यविषयक विविध उपक्रम राबविण्यात येत असून यामध्ये लोकसहभागावर भर देण्यात येत आहे.

# सीडबॉल बनविण्याचे प्रशिक्षण

## पर्यावरणहितासाठी स्तुत्य उपक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

फळे खाऊन झाल्यानंतर त्याच्या बिया इतरत्र टाकून देण्याऐवजी त्याचे पुनर्रोपण करण्याच्या दृष्टीने विचार झाला तर पर्यावरण संवर्धनासाठी ते एक महत्वाचे पाऊल आहे हे लक्षात घेत नवी मुंबई महापालिकेच्या वतीने सीड बॉल बनविण्याचा प्रशिक्षण कार्यक्रम बेलापूर येथील वारकरी भवन याठिकाणी उत्साहात संपन्न झाला.

महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली 'माझी वसुंधरा अभियान ६.०' अंतर्गत राबविण्यात आलेल्या या निसर्गहिताय उपक्रमात नवी मुंबई महापालिकेसह माता अमृतानंदमयी मठ तसेच तेरणा कॉलेज नेरूळ यांच्या एनएसएस युनिटचे विद्यार्थी मोठया संख्येने सहभागी झाले होते.

या वेळी सहभागी नागरिक व विद्यार्थ्यांना वेगवेगळया बियांपासून मातीचे गोळे तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले व नंतर त्यांनी स्वत:हून मातीचे गोळे अर्थात सीड बॉल तयार केले. हे सीड बॉल मोकळ्या जागेत टाकल्यानंतर बिजावरील माती विरघळून बियांची जमीनीत पेरणी होते व ते बीज मातीत रुजून त्यापासून वृक्षरोप तयार होते. वृक्षसंपत्ती वाढीसाठी हा उपक्रम अत्यंत लाभदायी असून विद्यार्थी व नागरिकांनी सीडबॉल बनविणे या उपक्रमात उत्साहाने सहभागी होत हा उपक्रम यशस्वी केला.

अशाप्रकारचे पर्यावरणहिताय उपक्रम नवी मुंबई महापालिकेच्या वतीने व्यापक प्रमाणात राबविले जाणार आहेत.



# शेतकऱ्यांना पीक विम्याविषयी मार्गदर्शन

**उरण : प्रतिनिधी**

भात पीक विम्याची अंतिम मुदत ३१ जुलै २०२५ असून, यामध्ये कोणत्याही प्रकारची मुदतवाढ मिळणार नाही. त्यामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी पीक विमा काढावा असे अहवान तालुका अधिकारी अर्चना सूळ- नारनवर यांनी केले आहे, मंडळ कृषी अधिकारी शुभम गटकळ, यांच्या मार्गदर्शनाखाली चिरनेर ग्रामपंचायत कार्यालयात काल २८ जुलै रोजी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत शेतकऱ्यांना पिक विमा काढण्याबाबत आवाहन केले. यावेळी तालुका पीक विमा प्रतिनिधी अनिल तांडेल यांनी शेतकऱ्यांना पिक विमा विषयीचे मार्गदर्शन केले.



यात पीक पेरणी पासून ते पीक काढणी पर्यंत सर्व कालावधीत नैसर्गिक आपत्ती, कीड रोग प्रादुर्भाव इत्यादी कारणामुळे पीक कापणी प्रयोगाद्वारे येणारे उत्पादन त्या महसूल उंबरठा उत्पादनापेक्षा कमी त्या महसूल मंडळातील विमा काढलेल्या शेतकऱ्यांना सम प्रमाणात नुकसान भरपाई मिळणार आहे. अशी माहितीही देण्यात आली. यावेळी शेतकऱ्यांना पिक विम्याच्या अर्जांचे वाटप करण्यात आले.

या वेळी कृषीमित्र तथा शेतीनिष्ठ शेतकरी प्रफुल्ल खारपाटील, सहाय्यक कृषी अधिकारी सुषमा गायकवाड यांच्यासह चिरनेर गावातील अनेक शेतकरी उपस्थित होते.

# 'लायन्स सरगम'तर्फे गरजू विद्यार्थ्यांना मदत

**पनवेल : वार्ताहर**

जे विद्यार्थी आपल्या आर्थिक परिस्थितीमुळे पुढील शिक्षण घेऊ शकत नाहीत असे विद्यार्थी पुढील शिक्षण घेण्यापासून वंचित राहु नयेत या हेतूने लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगम चे खजिनदार धवल शहा आणि त्यांचे काही मित्र यांनी लायन्स सरगमच्या माध्यमातून अशा विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण चालू ठेवण्यासाठी आर्थिक मदतीचा हात दिला.

उरण येथील नेटीव इन्स्टिट्यूट, आणि जनरल इन्स्टिट्यूट, दादर येथील काही गरजु विद्यार्थ्यांना त्यांच्या या शैक्षणिक वर्षाची संपूर्ण फी मुख्याध्यापिका नीलिमा नारखेडे यांच्या हवाली केली. या प्रसंगी सरगम क्लबचे अल्केश शहा, धवल शहा, द्रोणागिरी क्लबच्या मोनिका चौकर आदि मान्यवर उपस्थित होते.धवल शहा यांनी यावेळी सांगितले की जर कोणी विद्यार्थी आवड असून सुद्धा फी भरु न शकल्यामुळे शिक्षण घेऊ शकत नसेल तर आम्ही सरगम लायन्सच्या माध्यमातून जास्तीत जास्त मदत करण्याचा प्रयत्न नक्कीच करु. शाळेच्या मुख्याध्यापिका नीलिमा नारखेडे यांनी या मदतीबद्दल सरगम लायन्स क्लबचे आभार मानले.



# शिवसेना कार्यालयाचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

करंजाडे शहरातील नागरिकांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी शिवसेना जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन सेक्टर ६ प्लॉट नंबर १४ येथे जिल्हाप्रमुख अतुल भगत यांच्या हस्ते पार पडला.

करंजाडे येथील नागरिकांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी उपजिल्हाप्रमुख विनोद साबळे यांनी करंजाडे मध्ये जनसंपर्क कार्यालय सुरू केले. यावेळी तालुकाप्रमुख रघुनाथ पाटील, तालुका संपर्कप्रमुख बाळाराम नाईक, हितेश नाईक, गौरव गायकवाड, युवा सेना राज्य सचिव रुपेश पाटील, करंजाडे शहर प्रमुख महेंद्र शहारे, चंद्रकांत गुजर अजू सिंह यांच्यासह महिला, मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमात अनेक युवकांनी शिवसेनेत जाहीर पक्ष प्रवेश केला.



# लिओ क्लब ऑफ पनवेल बडिंग स्टारचा शपथग्रहण सोहळा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लिओ क्लब ऑफ पनवेल बडिंग स्टारचा शपथविधी सोहळा बांठिया शाळेच्या हॉलमध्ये मोठ्या उत्साहात झाला. उत्तम नेतृत्व, कर्तृत्व आणि समाजात वावरताना येणाऱ्या अनेक आव्हांनासाठी सक्षम पिढी घडवण्यात पनवेल लायन्स क्लब मागील सहा दशक मोलाची कामगिरी करीत आला असून त्यातीलच एक महत्वपूर्ण कार्य म्हणजे वंचित मुलांना उत्तम संधी उपलब्ध करून देण्यासाठी स्वखर्चाने प्रवाहात सहभागी करून घेणे.

याकरीता एकूण ५० विद्यार्थी, विद्यार्थीनींच्या लिओ क्लबचे उद्घाटन प्रांतपाल लायन संजीव सुर्यवंशी, द्वितीय प्रांतपाल लायन विजय गणात्रा, लिओ मल्टीपलचे अध्यक्ष शिशिर माहेश्वरी यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी जिल्हा लिओ अध्यक्ष रक्षान खान यांच्यासह सर्व पदाधिकारी उपस्थित होते.



या वेळी लायन्स क्लबच्या अध्यक्ष लायन सुरभी पेंडसे यांनी आपल्या प्रास्ताविकात नविन लिओ सभासदांना उत्तम मार्गदर्शन करत त्यांचे कौतुक केले. लिओ सल्लागार ज्योती देशमाने यांनी बांठिया शाळेचे प्राचार्य माळी सरांच्या सहकार्याबद्दल आभार मानून त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त केली. त्याचप्रमाणे मुलांची निवड करण्यासाठी वेलणकर मॅडम, खडतर सर, अश्विनी पाटील मॅडम, जाधव सर या सर्व शिक्षकांनी मेहनत घेऊन आम्हाला मदत केली त्यासाठी आम्ही सर्व त्यांचेही आभारी आहोत, असे सभेस सांगितले.

लिओ क्लब ऑफ पनवेलच्या अध्यक्ष लिओ डॉ. अरूषी गोडबोले यांनी आपल्या भाषणात लिओ क्लब पनवेल बडींग स्टार च्या नविन लिओजना नवनविन उपक्रमांची माहिती देऊन प्रोत्साहित केले.

# शिक्षक पालक-संघाची स्थापना

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल येथील कोकण एजुकेशन सोसायटीचे इंदुबाई वाजेकर इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये यावर्षीची पालक शिक्षक संघाची बैठक शनिवारी ता.२६ रोजी झाली. यावेळी पालक शिक्षक संघाची स्थापना करण्यात आली. यामध्ये अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सहसचिव व सदस्य असे निवड करण्यात आली. या बैठकीला शाळेचे चेअरमन व्ही.सी. म्हात्रे, माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापिका मनीषा पाटील, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका मानसी कोकीळ, यांच्यासह शिक्षिका व पालक सदस्य उपस्तित होते.

**यांची झाली निवड**

या वेळी पालक शिक्षक संघामध्ये पूर्व प्राथमिक व उच्च प्राथमिक विभागाच्या अध्यक्ष म्हणून शाळेच्या मुख्यध्यापिका मानसी कोकीळ, व माध्यमिक विभागाच्या मुख्यध्यापिका मनीषा पाटील यांची निवड करण्यात आली, तसेच पालकांमधून देशमुख कोमल, मोनाली जाधव, अश्विनी सहाणे, राजाराम रजक, प्रणाली पिंपळकर, शीतल फडतरे, सुप्रिया देशपांडे, रवींद्र गायकवाड, वैष्णवी तांबोळी, मानसी देशपांडे, शबाना खान यांची निवड करण्यात आली.

शाळेचे व्यवस्थापन करताना विद्यार्थी- पालक शालेय कर्मचारी तसेच व्यवस्थापक यांच्यात समन्वय रहावा, प्रत्येक शाळेत शिक्षक- पालक समिती स्थापन करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या अडीअडचणी शैक्षणिक, सामाजिक व शारीरिक समस्या तसेच विद्यार्थ्यांच्या गरजा, पालकांच्या माध्यमातून शालेय व्यवस्थापनापर्यंत पोहोचवून त्यातून मार्ग काढणे व विद्यालयातील समस्या दूर करण्यासाठी कोकण एजुकेशन सोसायटीचे इंदुबाई वाजेकर इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये २०२५ -२६ पालक व शिक्षक संघाची स्थापना करण्यात आली आहे. शाळा व्यवस्थापन, शिक्षक, पालक व परिसरातला समाज हे शैक्षणिक जगताचे चार आधारस्तंभ मानले जातात. विद्यार्थी हा केंद्रबिंदू ठरवून त्याच्या हितासाठी या चार स्तंभांनी एकत्रित सुसंवाद राखणे अपेक्षित आहे. शाळा व्यवस्थापन व पालक यांच्या शाळेसंदर्भात अनेक मुद्यावर मतभेद असतात.

या वेळी पालकांकडून आलेल्या सूचनांची नोंद घेऊन त्या सोडविण्याचे आश्वासन व्ही सी म्हात्रे यांनी दिले. सभेस उपस्थित पालक वर्गाकडून चेअरमन व्ही.सी म्हात्रे तसेच मुख्याध्यापिका मनीषा पाटील, मानसी कोकीळ व सर्व शिक्षक वर्ग यांचे कौतुक करून स्वागत करण्यात आले. त्याचबरोबर शिक्षिकानी पालक संघाची सविस्तर माहिती दिली.



# क्रांती पाटील यांचा पुरस्काराने सन्मान



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाई वैद्य फाऊंडेशन व आरोग्य सेना यांच्या वतीने प्राचार्या नलिनीताई भाई वैद्य समाजाभिमुख संस्था व शिक्षक राज्य पुरस्कार वितरण सोहळा पुणे येथे मोठ्या उत्साहात झाला.

या पुरस्कार सोहळ्यात पनवेल तालुक्यातील कुष्ठरोग निवारण समिती शांतिवन संचलित श्री अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे अनुदानित माध्यमिक आश्रमशाळा, वाकडी-शांतिवन येथील मुख्याध्यापिका क्रांती कृष्णा पाटील यांना समाजाभिमुख शिक्षक राज्य पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. समाजाभिमुख व विद्यार्थीप्रिय कार्याची दखल घेत त्यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच कुष्ठरोग निवारण समिती शांतिवन संस्थेलाही समाजाभिमुख संस्था राज्य पुरस्कार देण्यात आला.

या वेळी पुरस्कार प्रदान सोहळ्याला भाई वैद्य फाऊंडेशन व आरोग्य सेनेचे अध्यक्ष डॉ. अभिजित वैद्य, सरचिटणीस गीतांजली वैद्य, महात्मा फुले समता प्रतिष्ठानच्या सरचिटणीस ॲड. शारदा वाडेकर, शांतिवनचे ज्येष्ठ कार्यकर्ते विष्णु प्रभुदेसाई, कार्यकारी मंडळ सदस्य विनायक शिंदे, शेख सर, कोमल पाटील (मुलगी), समीर पेणकर, तसेच भाजप पनवेल शहर महिला सरचिटणीस सपना पाटील आदी उपस्थित होते.

क्रांती पाटील यांना पुरस्काराबद्दल अभिनंदन करण्यात आले. या वेळी माजी नगरसेविका दर्शना भोईर, सपना पाटील, कोमल पाटील, कविता पाटील, अरूणा पाटील आशा तळोजकर, नीता मंजुळे, सोनल महाडीक, दळवीताई, प्रज्ञा पाटील, प्रिया पाटील आदी उपस्थित होते.

# नवी मुंबई बँकेला पुरस्कार

**नवी मुंबई :** दि महाराष्ट्र राज्य बँक असोसिएशन लि.चा कोकण विभागातून २५० कोटी ठेवी गटातील पद्मभूषण कै. वसंतदादा पाटील उत्कृष्ट बँक प्रथम पुरस्कार नवी मुंबई को-ऑप. बँकेस मिळाला. सहकार राज्यमंत्री यांच्या हस्ते बँकेला गौरविण्यात आले. बँकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सीईओ, सहाय्यक महाव्यवस्थापक आदी उपस्थित होते.

**दुरुस्ती**

दैनिक रामप्रहरच्या मंगळवार, दि. २९ जुलै रोजी प्रसिद्ध झालेल्या कमळ पतपेढीच्या वृत्तामध्ये संस्थेची २०वी वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली असे अनावधानाने छापून आले आहे. वस्तुत: ती ३०वी वार्षिक सभा होती.




## पाऊस आणि कविता

आला पाऊस पाऊस
शब्दघन कोसळले...
नाते 'त्याचे' आणि 'तिचे'
कधी कोणाला कळले...!
तोचि दाटला आभाळी
भासे तिला तो सावळा...
फूलवितो तो शिवार
हिला दिसे घननीळा...
वाही तोची नदी-नाले
वृक्ष-वेली फुले-राने...
'तिचे' मात्र शहारणं
चिंब भिजलेली मने...
त्याला वाटे बरसावे
देत सुख शिवारात...
तिचं वेचणं प्राजक्त
मोर नाचे आवारात...
त्याचे चोहीकडे पाणी
तृषा शमताना पाहे...
अश्रू आठवणींचे ते
तिच्या डोळ्यातून वाहे...
असा येताची पाऊस
कविताही जन्म घेते...
कधी दूषणेही त्याला
गुण मात्र तीच गाते...



-मनोज उपाध्ये,
पनवेल

# नेरळ-माथेरान घाटात अपघातांची मालिका सुरूच



**माथेरान : प्रतिनिधी**

नेरळ-माथेरान घाटात अपघाताची मालिका सुरूच असून सोमवारी (दि.२८) सायंकाळी घाट उतरतेवेळी आपल्या गाडीवरील नियंत्रण सुटल्याने पर्यटकाच्या गाडीचा अपघात झाला. यामध्ये कोणतीही जीवित हानी झाली नसून गाडीचे मोठे नुकसान झाले आहे.

माथेरान पर्यटनस्थळी वर्षा पर्यटनासाठी पर्यटक मोठ्या प्रमाणावर येत आहेत.या वेळी मद्यपान करून वाहन चालवणे एका पर्यटकाला चांगलेच महागात पडले आहे. नेरळ माथेरान घाटात घडलेल्या अपघाता मध्ये पर्यटकाच्या नव्या कोऱ्या गाडीचे मोठे नुकसान झाले असून गाडीमधील सहप्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत.

प्राथमिक माहिती नुसार नेरळ-माथेरान घाटातील जुम्मापट्टी येथील वळणादार रस्त्यावर वाहन चालक पर्यटकाने गाडीवरील नियंत्रण गमावले त्यामुळे वाहन थेट रस्त्याच्या कडेला खड्यात उलटले मात्र या मधील प्रवासी थोडक्यात बचावले आहेत. सुदैवाने येथे मोठी दुर्घटना टळली. अपघातात वाहनाचे खूप मोठे नुकसान झाले. अपघातात वाहनाचा पुढील भाग, मागील भाग आणि बाजूचा भाग पूर्णपणे चेंबले आहेत

या घटनेत वाहन चालकाचा मित्र किरकोळ जखमी झाला असून त्याच्यावर प्राथमिक उपचार करण्यात आले. अपघाताची घटना समजताच स्थानिकांनी याची माहिती पोलिसांना दिल्यानंतर पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि पुढील कारवाई सुरू केली. माथेरान घाटात अपघाताची मालिका सुरूच असल्याचे बोलले जात आहे.

# पर्यटन उद्योगाच्या प्रचार व प्रसारासाठी नव्या धोरणांची अंमलबजावणी

**रायगड : रामप्रहर वृत्त**

राज्यातील पर्यटन उद्योगाच्या प्रचार व प्रसारासाठी महाराष्ट्र शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. ३०.०४.२०२५ पासून अंमलात आलेल्या शासन निर्णयानुसार, आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरावरील खाजगी आयोजनकर्त्यांच्या माध्यमातून आयोजित होणाऱ्या पर्यटन विषयक कार्यक्रमांमध्ये महाराष्ट्राच्या पर्यटनाच्या प्रतिमानिर्मिती आणि ब्रँडिंगसाठी खास धोरणे अंमलात आणली जात आहेत.

या योजनेंतर्गत स्थानिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कार्यक्रमांमध्ये सहभागी होणाऱ्या संस्थांना अनुदान व सहकार्य दिले जाणार आहे. यात खाजगी संस्था, स्वयंसेवी संस्था, सहकारी संस्था व अन्य आयोजक समाविष्ट आहेत. पर्यटन व सांस्कृतिक वारसा, साहसी पर्यटन, खाद्य महोत्सव, क्राफ्ट व हँडीक्राफ्ट प्रदर्शन, MICE इव्हेंट्स (मीटिंग, प्रेझेंटेशन, एक्झिबिशन), डिजिटल मोहिमा, मीडिया टूर, फॅम टूर, इत्यादी उपक्रमांना प्रोत्साहन दिले जाणार आहे.

पर्यटन क्षेत्रातील ब्रँडिंग: महाराष्ट्र पर्यटन विभाग वार्षिक पर्यटन विपणन आणि ब्रँडिंग योजना तयार करणार असून, त्याअंतर्गत प्रचार उपक्रम राबवले जातील. प्रचार साहित्य निर्मिती: OTT प्लॅटफॉर्म, डिजिटल मीडिया, दूरचित्रवाणी, रेडिओ, फील्ड इव्हेंट्स व लोकशाहीरांच्या माध्यमातून महाराष्ट्र पर्यटनाचा प्रचार केला जाईल. Social Media Influencer चा वापर: १ लाख फॉलोअर्स असलेल्या प्रभावी इन्फ्लुएंसर्सकडून महाराष्ट्र पर्यटनाशी संबंधित साहित्य तयार करून त्याद्वारे प्रभावी जनजागृती केली जाणार आहे.

पर्यटन विभागाच्या अपर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. यामध्ये पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, गृह व सांस्कृतिक कार्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी सदस्य म्हणून असतील. ही समिती पात्र प्रस्तावांना मान्यता देणार आहे.

पात्र संस्था ही नोंदणीकृत संस्था असावी. प्रस्ताव सादर करण्यासाठी ऑनलाईन प्रणालीवर अर्ज करणे आवश्यक आहे.प्रस्तावात कार्यक्रमाचा तपशील, उद्दिष्ट, खर्चाचा तपशील, प्रचार माध्यमे, अपेक्षित लाभ इत्यादींचा समावेश असावा.

मंजूर प्रस्तावासाठी निश्चित वेळेत 'Statement of Expenditure' सादर करणे बंधनकारक आहे.

इतर अटी व शर्ती - पर्यटन विभागाच्या लोगोचा वापर पर्यटन विभागाच्या संमतीने करावा लागेल. नियोजित कार्यक्रम पर्यटन विभागाच्या उद्दिष्टांशी सुसंगत असावा. मान्यताप्राप्त मीडिया संस्थांकडून प्रसिद्धी करण्यात यावी. कार्यक्रमात महाराष्ट्र पर्यटन विभागाचे प्रतिनिधित्व आवश्यक आहे.

अधिक व तपशिलवार माहितीसाठी शासन निर्णय क्र. महोत्सव-२०१८/१२/ प्र.क्र.११२६/पर्यटन-३ दि. ३० एप्रिल २०२५ पाहावा. हा शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक २०२५०४३०१८०६०५४५२३ असा आहे.

या योजनेंतर्गत राज्यातील विविध संस्थांना पर्यटनविषयक कार्यक्रम आयोजनासाठी शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार मार्गदर्शन मिळणार असून, पर्यटन क्षेत्राचा विस्तार व प्रचार करण्यासाठी ही योजना एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.

# रूपेश कर्णेकर यांच्या रांगोळीची जागतिक पटलावर दखल



**धाटाव : प्रतिनिधी**

रोह्यातील चित्रकार रुपेश कर्णेकर यांनी भुवनेश्वर येथे शिवराज्यभिषेक रांगोळी साकारली होती. शिवराज्यभिषेकास ३५० वर्षे झाल्याचे औचित्य साधून ४५० फूट लांब व २५० फूट रुंद अशी एक लाख पंचवीस हजार स्केअर फूट रांगोळी कर्णेकर यांच्या समवेत ३५ कलाकारांच्या टीमने ही रांगोळी तयार केली.

या रांगोळीचे परीक्षण करण्यासाठी जगभरातून तज्ञ टीम उपस्थित होती. ही रांगोळी मागील वर्षी रोह्यात साकारली होती. आता या रांगोळीची जागतिक पातळीवर दखल घेत सर्वोत्कृष्ट रांगोळी म्हणून लंडन, युएसए भारत बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नोंद करण्यात आली आहे. त्यामुळे आणखी एक मानाचा तुरा रायगड जिल्ह्याच्या शिरपेचात रोवला गेला आहे.

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार सुनील तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे, महिला व बालकल्याण मंत्री यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या शिवराज्यभिषेक रांगोळीची सर्वोत्कृष्ट रांगोळी म्हणून लंडन, युएसए भारत बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नोंद झाल्याने रायगड जिल्ह्यात सर्वत्र शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.

रोह्यातील रोठ गावचे रहिवासी रुपेश कर्णेकर हे विविध रांगोळ्या सातत्याने साकारात असतात. रुपेश कर्णेकर हे मागील १५ ते १६ वर्षे रोह्याचे आराध्ये दैवत श्री धावीर महाराज यांची रांगोळी काढून एक प्रकारची सेवा देत भक्तांचे मनोरंजन करत देवाची भावना नागरिकांच्या मनात रुजवत आहेत.

# भाजप खालापूर पूर्व मंडळाची कार्यकारिणी जाहीर

**खालापूर : रामप्रहर वृत्त**

भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, आमदार प्रशांत ठाकूर, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, आणि माजी आमदार सुरेश भाऊ लाड यांच्या नेतृत्वाखाली मंडळ अध्यक्ष सनी यादव यांनी खालापूर पूर्व मंडळाची कार्यकारणी जाहीर केली. ह्या कार्यकारणीमध्ये १६ पदाधिकारी, पाच महिला व १६ मुख्य पदाधिकारी तसेच ६१ मुख्य कार्यकर्ते असणार आहेत. यानंतर मोर्चे, आघाडी, प्रकोष्ट, पंचायत समिती गण कार्यकारणी, जिल्हा परिषद कार्यकारणी आणि ग्रामपंचायत कार्यकारणी असणार आहे एकंदरीत याचा विचार केला तर आगामी काळात ५००ते ५५० पर्यंत नियुक्तीचे आकडे होतील.

नियुक्त्यांमध्ये सरचिटणीस रविंद्र कृष्णा पाटील, सरचिटणीस प्रसाद रामजी पाटील, उपाध्यक्ष अजित गजानन देशमुख, उपाध्यक्ष राकेश जयराम जाधव, उपाध्यक्ष विकास काळुराम रसाळ, उपाध्यक्ष हेमंत गणपत पाटील, उपाध्यक्ष महिला मोर्चा निकिता संजय हेलांडे, उपाध्यक्ष महिला मोर्चा माधुरी रोहिदास पाटील, चिटणीस संदीप मोरे, चिटणीस सुनील सुखदरे, चिटणीस राम बाळ्या वाघमारे, चिटणीस समीर देशमुख, चिटणीस महिला ज्योती दिनेश मोरे, चिटणीस महिला राखी गणेशकर, कोषाध्यक्ष महिला दिपाली राकेश शिर्के तसेच सदस्य पुढीलप्रमाणे सुधीर बांदल, अविनाश साळेकर, महेश कडू, दिनकर हातानोलकर, मिलिंद विध्वंस, अर्पिता पाटील, संतोष तांडेल, मोहन घाडगे, रसिका पाटील, पौर्णिमा बांदल, संतोष साळुंखे, भरत महाडिक, अनिल जाधव, संजय देशमुख, नागेश पाटील, दत्ताराम पाटील, संतोष हातानोलकर, विशाल कडव, अरुण घोंगे, गणेश डोखले, अनुप शिंदे, रविंद्र मोरे, विशाल लोते, सुप्रिया तटकरे, ज्ञानेश्वर पारंगे, लवेश कर्णुक, हरेश पाटील, राजश्री पाटील, सुजाता दळवी, मयुर पाटील, प्रसाद देशमुख, दिपक जगताप, श्वेता मनवे, स्वाती लोते, जयेंद्र पाटील, केतन वाघमारे, मनोहर पवार, भाऊ गायकवाड, जयश्री तटकरे, ऋतुजा कडव, पायल म्हामुनकर, रोहिणी पाटील, वत्सला मोरे, सुनीता भालेराव, दुर्वा साळुंखे अशी कार्यकारणी असेल. लवकरच गाव, वाड्या आणि वस्ती येथे भाजप शाखांची नेमणूक करण्यात येणार आहे, असे मंडळ अध्यक्ष सनी यादव यांनी सांगितले आहे. खालापूर पूर्व तालुका भाजप नेते नरेश पाटील, जिल्हा उपाध्यक्ष विठ्ठल मोरे यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी खालापूर पूर्व मंडल कार्यकारिणीचे स्वागत करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# स्वच्छतेसाठी दरपत्रकाचे आवाहन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हाधिकारी यांचे निवासस्थान येथील स्वच्छता राहण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी कार्यालय, अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय, नियोजन भवन, रेकॉर्ड रूम इत्यादी इमारतींचे आवारातील स्वच्छतागृहे व बाहेरील परीसर स्वच्छतेसाठी वार्षिक ठेका देणे आवश्यक आहे, जेणेकरुन जिल्हाधिकारी कार्यालयाचे आवारात व कार्यालयात स्वच्छता राहील.

जिल्हाधिकारी कार्यालय, अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय, नियोजन भवन, रेकॉर्ड रूम इत्यादी इमारतीचे आवारातील स्वच्छतागृहे व बाहेरील परीसर स्वच्छतेसाठी दरपत्रक मागविण्यात येत आहेत. तरी इच्छूकांनी ४ ऑगस्ट २०२५ पर्यंत सदरचे दरपत्रक सामान्य शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग येथे देण्यात यावेत. या कामाबाबतच्या अटी व शर्ती व आवश्यक कागदपत्राबाबत माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नोटीस फलकावर लावण्यात आल्या असून त्यांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील.

# समाजोपयोगी कार्याने वाढदिवस साजरा

**चौक : प्रतिनिधी**

समाजच आपण देणं लागतो, ही भावना आपल्या मनात निर्माण होते, त्यावेळी समाजोपयोगी कार्य घडत जाते, असे उदगार रायगड भूषण, ज्येष्ठ कीर्तनकार, वारकरी विद्यार्थी गुरुकुल चालक हभप.रामदास महाराज पाटील यांनी केले.



समाजसेवक व युवा नेते बंटी नलावडे यांचा वाढदिवस अत्यंत साधेपणाने समाजोपयोगी कार्यक्रम आयोजित करून साजरा करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. वाढदिवसानिमित्त देव्हन्हावे, दहिवली, सांगडेवाडी येथील प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा हायस्कुल व अंगणवाडी विद्यार्थी यांना वह्या, स्कुल बॅग, खाऊ, शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. पाली फाटा ते कारगाव दरम्यान प्रवासी थांबा येथे प्रवाशी यांना बनण्यास थांब्यावर बेंच बसविण्यात आले. त्याच प्रमाणे इ.१० वी व इ.१२ वी उत्तीर्ण विद्यार्थी यांचा सत्कार करून त्यांनाही शैक्षणिक मदत करण्यात आली.

कार्यक्रमासाठी अंकित साखरे, खालापूर लायन हभप किशोर पाटील, सरपंच ग्रामपंचायत देव्हन्हावे व सर्व ग्राम पंचायत सदस्य व गावातील मान्यवर उपस्थिती होते.

# नेवरूळच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये छत्रीवाटप

**माणगाव : बातमीदार**

नेवरूळ ग्रामीण भागातील विद्यार्थी दररोज किमान तीन ते चार किलोमीटरचा प्रवास करून नेवरूळ हायस्कूलमध्ये येत असतात. पावसाळ्याच्या दिवसांमध्ये त्यांना अनेक नैसर्गिक आपत्तीला सामोरे जावे लागते. त्यांना माणगाव वाहतूक शाखेमध्ये प्रामाणिकपणे कार्य व जबाबदारी बजावणारे स्व. विशाल येलवे यांच्या पत्नी श्रीमती. सुवर्णा येलवे यांनी शाळेतील ३५ विद्यार्थ्यांना छत्री तसेच शेजारील रा.जि.प शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप केले



कै. विशाल येलवे यांच्या स्मरणार्थ गेली तीन वर्ष सातत्याने वेगवेगळ्या परिसरामध्ये दुर्गम भागांमधील विद्यार्थ्यांना मदतीचा हात म्हणून सहाय्य करतात त्यांना सामाजिक कार्यकर्ते महेश मोरे यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना छत्री वाटपाबाबत शाळा प्रशासनाबरोबर चर्चा करून दानशूर व्यक्तींना प्रत्यक्ष भेटून याबाबत माहिती दिली होती. येलवे यांच्या पश्चात पत्नी सुवर्णा,दोन मुले संस्कृती, संस्कार असे कुटुंब आहे. वाटप कार्यक्रम प्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना महेश मोरे यांनी या कुटुंबाबद्दल उपस्थितांना माहिती दिली.

न्यू इंग्लिश स्कूल शाळेचे संस्थापक शिक्षण महर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांच्या बद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. श्रीमती सुवर्णा येलवे यांनी आपल्या मार्गदर्शनामध्ये विद्यार्थ्यांना पुढील उच्च शिक्षण घेऊन आपले जीवनमान उंचवावे एक आदर्श व्यक्तिमत्व निर्माण करावे, असे मार्गदर्शन करून पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमास शाळेचे चेअरमन माजी सभापती रवींद्र लाड, ग्राम सदस्य शंकर कासार, अध्यक्ष नामदेव महाडिक, पोलीस पाटील निलेश लटके, ग्रामपंचायत माजी सदस्य स्वप्निल लाड, ग्रामपंचायत सदस्य अशोक लाड, स्वरा महागावकर , शंकर काते, माजी सरपंच तुकाराम दिवेकर आदी मान्यवर उपस्थित होते. शाळेचे मुख्याध्यापक मिनेकर सर यांनी उपस्थितांचे यथोचित स्वागत केले. उपस्थित विद्यार्थ्यांना येलवे कुटुंबीयांच्या वतीने छत्री व शैक्षणिक साहित्य व शेवटी खाऊचे वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचलन कापसे सर यांनी केले.

# प्रबुद्ध भूमी फाउंडेशनतर्फे शैक्षणिक साहित्याचे वाटप

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील नांदगाव बुद्रुक येथे प्रबुद्ध भूमी फाउंडेशन च्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने या शैक्षणिक साहित्याचे वाटप केल्याचे आयोजकांनी सांगितले.

नांदगाव बुद्रुक येथील महाबोधी बुद्ध विहारात शैक्षणिक साहित्य वाटपाचा हा कार्यक्रम झाला. या वेळी बौद्ध विकास मंडळाचे खजिनदार व आर. पी आय. बांद्रा तालुका अध्यक्ष प्रमोद चायाजी जाधव, सत्यवान राऊळ, सरपंच अलका ताई चिले, पोलिस पाटील गिरीश गायकर, सुशांत चिले यांच्यासह ज्येष्ठ ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी प्रमोद जयाजी जाधव यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना हे शैक्षणिक साहित्य एक प्रोत्साहन देण्याकरता असून तुम्ही तुमच्या जिद्दीच्या बळावर यश संपादन करत जा असा मोलाचा सल्ला दिला.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी स्थानिक भावकीचे पदाधिकारी व महिला, तरुण तरुणी मंडळ तथा विद्यार्थी यांनी अथक मेहनत घेतली. या वेळी प्रमोद चायाजी जाधव यांचे ग्रामस्थांच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.



# वडगाव उच्च प्राथमिक शाळेची भरारी

## केंद्र आणि राज्य सरकारच्या पोर्टलवर उपक्रमांची नोंद

**चौक : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषदेची खालापूर तालुक्यातील उच्च प्राथमिक शाळा वडगाव यांची यशोगाथा केंद्र व राज्य शासनाच्या MIEPA या पोर्टलवर झळकल्याने वडगांव शाळेची दिल्ली भरारी झाल्याने शाळेवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



वडगांव शाळा ही कायम विविध व नावीन्यपूर्ण उपक्रमाने चर्चेत असते. या उपक्रमांची दखल महाराष्ट्र राज्य शैक्षणिक नियोजन व प्रशासन MIEPA या संस्थेने घेत वडगाव शाळेची यशोगाथा आपल्या पोर्टलवर प्रकाशित केली आहे. तसेच या शाळेच्या यशोगाथेची दखल राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन व प्रशासन MIEPA या संस्थेने घेतली असून आपल्या राष्ट्रीय पोर्टलवर शाळेची यशोगाथा https://ncsl.niepa.ac.in/schoolleadershipacademy/maharashtra/ maharashtrašrepositoryščaseššstudy.php या लिंकवर प्रकाशित केली आहे. यात शाळा गैरहजर विद्यार्थ्यांच्या दारी, भात लावणी, स्वीप अंतर्गत मतदार जनजागृती, एक पेड माँ के नाम, चला वाचूया वाचन चटई, रिडींग गार्डन, भाषा, गणित प्रयोगशाळा यासाठी अनेक व्यावसायिक कंपन्यांकडून शाळेसाठी CSR च्या माध्यमातून आर्थिक मदत उपलब्ध करून शैक्षणिक दर्जा सुधारणेचा प्रयत्न शाळेच्या मुख्याध्यापक सुभाष राठोड यांनी केला.

जिल्हा परिषदेच्या तत्कालीन शिक्षणाधिकारी पुनीता गुरव, शेडगे उपशिक्षणाधिकारी शेडगे, सुनील भोपळे, डायट पनवेलचे प्राचार्य डॉ.इरफान ईनामदार यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.पंचायत समिती खालापूर यांच्या मार्गदर्शनाखाली शाळा विविध उपक्रमांचे आयोजन करत असते. रायगड जिल्हा परिषदेला राष्ट्रीय स्तरावर पोहचविणारी रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा वडगाव म्हणून शाळेकडे पाहिले जात आहे. सर्व स्तरातून शाळेचे व शिक्षकांचे कौतुक होत आहे. मुख्याध्यापक सुभाष राठोड, सहशिक्षक वैजनाथ जाधव, पदवीधर शिक्षिका मयुरी धायगुडे यांचे योगदान असून शाळा व्यवस्थापन समिती, ग्रुप ग्रामपंचायत वडगाव यांचे सहकार्य लाभले.

# डॉ. चंद्रशेखर साकोलीकर यांचा सन्मान

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथील प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ. चंद्रशेखर साकोलीकर यांनी सूर महाराष्ट्राचा या मराठमोळ्या स्पर्धेत आपल्या सुमधुर आवाजात बहारदार गीत गाऊन उत्कृष्ट सादरीकरण केल्याबद्दल त्यांचा सन्मानपत्र देऊन डॉ.धनश्री हरदास व निखिल मुळे यांनी विशेष सन्मान केला. डॉ.चंद्रशेखर साकोलीकर यांना मिळालेल्या या सन्मानाबद्दल त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.



डॉ.चंद्रशेखर साकोलीकर हे माणगावमधील प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉक्टर असून त्यांचे माणगावात माहेर मॅटर्निटी नावाने सुसज्ज हॉस्पिटल आहे. याठिकाणी ते रुग्णांची सेवा करीत असतात. आपला डॉक्टरी व्यवसाय सांभाळून त्यांना लहानपणापासूनच संगीत व गायनाची विशेष आवड असल्याने त्यांनी मुंबई, पुणे, पनवेल,नवी मुंबई,माणगाव आदी विविध ठिकाणच्या मोठमोठ्या रंगमंचांवरून बहारदार असे गीत सादर करून रसिक प्रेक्षकांना बेहद खुश केले आहे.

# अल्पवयीन मुलांकडून वयोवृध्द महिलेचा खून

**म्हसळा : प्रतिनिधी**

म्हसळा तालुक्यातील कणघर आणि खामगाव गावांतील दोन शाळकरी मुलांनी कणघर येथील शेवंती सखाराम भावे (वय ८०) या वयोवृद्ध महिलेचा गळा दाबून खून केला. याबाबत म्हसळा पोलीस ठाण्यात गुन्हा गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

खामगाव परिसरांतील १०वी वर्गांतील दोन शाळकरी मुलांनी वयोवृद्ध आजीचा गळा दाबून खून केल्याचे कबूल केले. कणघर येथील शेवंती आजीने गावांतील परिचित शाळकरी मुलाला घरांतील बंद असलेला टीव्ही नीट करायला कोणाला तरी बोलाव असे सांगितले. शेवंती आजी वयोवृद्ध व घरांत एकटीच असते याचा गैरफायदा घेत स्थानिक मुलाने आपल्याच खामगाव येथील मित्राला मॅकॅनिक बनवून आजीला फसविण्याच्या उद्देशाने आणले. टिव्ही दुरुस्तीसाठी आजीकडून एक हजार रुपये घेतले आणि दोघांचीही नजर आजीच्या कानांतील दागिने व जोडून असणाऱ्या साखळीवर गेली. त्यांनी काही क्षणांत आजीच्या गळ्याचा घोट घेतला व कोणालाही शंका न यावी म्हणून शेवंती आजीला कॉटवर झोपवून नैसर्गिक मृत्यूचा बनाव केला.

अल्पवयीन मुलांनी दागिने गोरेगाव येथील सराफाला विकले आसल्याच्या संशयावरून म्हसळा पोलीस त्या व्यापाराच्या आणि साथीदाराच्या मार्गावर आहेत. दोनही अल्पवयीन बाल गुन्हेगारांना कर्जत येथील बाल सुधारगृहांत ठेवण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. गुन्ह्याचा तपास सुरू आहे.

# स्पेनला नमवून इंग्लंडने राखले युरोचे विजेतपद




**बासेल : वृत्तसंस्था**

इंग्लंडच्या महिला फुटबॉल संघाने युरो २०२५ स्पर्धेच्या अंतिम फेरीत स्पेनवर ३-१ अशा पेनल्टी शूटआऊटने विजय मिळवत सलग दुसऱ्यांदा युरोपियन चषकावर आपले नाव कोरले. बासेल (स्वित्झर्लंड) येथील सेंट जेकब पार्क स्टेडियमवर झालेल्या या थरारक सामन्यात दोन्ही संघांनी १-१ अशी बरोबरी साधली होती, मात्र पेनल्टी शूटआऊटमध्ये इंग्लंडने बाजी मारली.

सामन्याच्या २५व्या मिनिटाला स्पेनच्या मारिओना काल्डेन्टेने हेडरद्वारे आघाडी मिळवली, परंतु इंग्लंडच्या अलेसिया रुसोने ५७व्या मिनिटाला क्लो केल्लीच्या क्रॉसवर गोल करत बरोबरी साधली. दोन्ही संघांनी १२० मिनिटे झुंज दिल्यानंतर निकाल लागला नाही. त्यामुळे सामना पेनल्टी शूटआऊटकडे गेला.

पेनल्टी शूटआऊटमध्ये इंग्लंडच्या गोलरक्षक हॅना हॅम्पटनने दोन अप्रतिम बचाव करत संघाला आघाडी मिळवून दिली. निर्णायक क्षणी क्लो केल्लीने विजयी पेनल्टी गोल केला आणि इंग्लंडच्या चाहत्यांमध्ये जल्लोष उसळला. या विजयामुळे इंग्लंडने २०२२नंतर पुन्हा युरो विजेतपद पटकावले. संघाच्या कर्णधार, खेळाडूंनी टीम स्पिरीट आणि जिद्दीचे कौतुक केले. इंग्लंडच्या या ऐतिहासिक विजयाचे पंतप्रधान, राजघराणे आणि जगभरातील फुटबॉलप्रेमींनी अभिनंदन केले.

# विश्वविजयानंतर दिव्याला अश्रू अनावर

## आईला मारलेली भावनिक मिठी व्हायरल

**बाटुमी (जॉर्जिया) : वृत्तसंस्था**

बुद्धिबळाच्या पटावर एका नव्या युगाचा प्रारंभ झाला आहे. नागपूरच्या अवघ्या १९ वर्षीय दिव्या देशमुखने अनुभवी कोनेरू हंपीला चित्तथरारक लढतीत नमवत फिडे महिला विश्वचषक जिंकला. या एकाच विजयाने तिने केवळ विश्वविजेतेपदावरच नव्हे, तर 'ग्रँडमास्टर' किताबावरही शिक्कामोर्तब केले. विजयावर शिक्कामोर्तब होताच दिव्याला भावना अनावर झाल्या आणि तिने आपल्या आईला मारलेली भावनिक मिठी चर्चेचा विषय ठरली आहे.



ही लढत केवळ दोन खेळाडूंमधील नव्हती, तर दोन पिढ्यांमधील होती. एकीकडे ३८ वर्षीय अनुभवी हंपी, तर दुसरीकडे तरुण आणि महत्त्वाकांक्षी दिव्या. शनिवार व रविवारचे दोन्ही क्लासिकल डाव बरोबरीत सुटल्याने विजेतपदाचा निर्णय टायब्रेकरवर गेला. टायब्रेकरमध्ये दिव्याने संयम आणि आक्रमकतेचा सुंदर मिलाफ साधत १.५-०.५ असा विजय मिळवला. दुसऱ्या डावात वेळेच्या दबावाखाली असलेल्या हंपीने ४०व्या चालीवर केलेल्या एका चुकीचा फायदा उचलत दिव्याने इतिहासाच्या पानांवर आपले नाव कोरले.

या स्पर्धेत एकही जीएम नॉर्म नसताना प्रवेश केलेल्या दिव्याने थेट विश्वविजेतपद आणि ग्रँडमास्टर किताब पटकावून सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला. या विजयासह दिव्या भारताची ८८वी ग्रँडमास्टर आणि कोनेरू हंपी, हरिका द्रोणावल्ली व आर. वैशाली यांच्यानंतर चौथी महिला ग्रँडमास्टर ठरली आहे. विजयानंतर दिग्गज हंपीशी हस्तांदोलन करून ती थेट आईकडे धावली. आईला मारलेल्या कडक मिठीत तिचे अश्रू थांबत नव्हते. मायलेकींच्या या भावनिक क्षणांचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे.

# पाचव्या कसोटीसाठी ओव्हरटन इंग्लंडच्या ताफ्यात

**लंडन : वृत्तसंस्था**

भारत आणि इंग्लंड या दोन्ही संघांमध्ये पाच कसोटी सामन्यांची मालिका सुरू आहे. या मालिकेतील मँचेस्टरमध्ये झालेला चौथा सामना अनिर्णित राहिला. दरम्यान, पाचव्या सामन्याआधी इंग्लंडने आपल्या संघात एक बदल केला आहे.

चौथ्या सामन्यात भारतीय संघाचा पराभव जवळजवळ निश्चित होता, पण भारतीय फलंदाजांनी दमदार फलंदाजी करून हा पराभव टाळला. सध्या या मालिकेत इंग्लंडचा संघ २-१ने आघाडीवर आहे. मालिकेतील पाचवा आणि निर्णायक कसोटी



सामना ओव्हलमध्ये रंगणार आहे. या सामन्यासाठी इंग्लंडने अष्टपैलू खेळाडू जेमी ओव्हरटनला मुख्य संघात स्थान दिले आहे.

ओव्हरटनला २०२२मध्ये लीड्सच्या मैदानावर एकमात्र कसोटी सामना खेळण्याची संधी मिळाली होती. या सामन्यात गोलंदाजी करताना त्याने दोन गडी बाद केले, तर फलंदाजी करताना त्याने ९७ धावांची दमदार खेळी केली. त्याला यंदाच्या आयपीएल स्पर्धेत चेन्नई सुपर किंग्ज संघाकडून तीन सामने खेळण्याची संधी मिळाली होती.

इंग्लंडने पाचव्या कसोटीसाठी हा एकमेव बदल केला आहे, तर उर्वरित १४ खेळाडू तेच आहेत जे गेल्या सामन्यातही संघाचा भाग होते. प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये गोलंदाजी करताना जेमीने ९८ सामन्यांमध्ये २३७ गडी बाद केले आहेत. यादरम्यान फलंदाजी करताना त्याने २४०१ धावा केल्या आहेत. त्याची ही दमदार कामगिरी पाहता त्याला पुन्हा संघात घेतले आहे.

# जडेजाला डिवचणाऱ्या स्टोक्सला अश्विनने सुनावले खडे बोल

**चेन्नई : वृत्तसंस्था**

भारतीय संघाचा अनुभवी फिरकीपटू रविचंद्रन अश्विनने इंग्लंडचा कर्णधार बेन स्टोक्सच्या खिलाडूवृत्तीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत त्याच्यावर सडकून टीका केली आहे. मँचेस्टर कसोटीच्या शेवटच्या दिवशी रवींद्र जडेजाला डिवचणाऱ्या स्टोक्सच्या कृतीवर अश्विनने तीव्र नाराजी व्यक्त केली. 'तुमच्या निराशेपोटी तुम्ही खेळभावनेला हरताळ फासू शकत नाही,' अशा शब्दांत अश्विनने स्टोक्सला खडे बोल सुनावले आहेत.



मँचेस्टर कसोटीच्या पाचव्या दिवशी सामना अनिर्णीत अवस्थेत होता. भारताकडून रवींद्र जडेजा आणि वॉशिंग्टन सुंदर अभेद्य भागीदारी करत शतकाच्या दिशेने वाटचाल करत होते. भारतीय फलंदाजांना रोखण्यात अपयशी ठरल्याने इंग्लंडचा संघ निराश झाला होता. याचवेळी कर्णधार स्टोक्सने सामना थांबवण्याचा प्रयत्न केला, पण जडेजा आणि सुंदर शतकाच्या जवळ असल्याने भारताने खेळणे सुरूच ठेवले.

यामुळे चिडलेल्या स्टोक्सने जडेजाला डिवचण्याच्या हेतूने त्याच्याशी शाब्दिक बाचाबाची केली. स्टोक्सच्या या उद्धटपणावर अश्विनने आपल्या 'ॲश की बात' या यूट्यूब शोमध्ये जोरदार टीका केली. अश्विन म्हणाला, हा तर दुटप्पीपणा आहे. भारतीय फलंदाजांनी दिवसभर तुमच्या गोलंदाजांचा सामना केला आणि जेव्हा ते शतकाच्या जवळ आले, तेव्हा तुम्हाला सामना संपवायचा होता? त्यांनी का थांबावे? तुम्ही विचारता, 'तुला हॅरीविरुद्ध शतक करायचे आहे?' अरे भावा, त्याला शतक करायचेच आहे. तुम्ही ब्रूकला का आणता? हवं तर स्टीव्ह हार्मिसन किंवा अँड्र्यू फ्लिटॉँफला निवृत्तीतून परत बोलवा, तरीही तो शतक करेल.

स्टोक्सने केवळ निराशेपोटी हे कृत्य केले असून क्रिकेट कुणा एका व्यक्तीच्या मर्जीनुसार चालत नाही, असेही अश्विनने स्पष्ट केले. जडेजा आणि सुंदरने द्विशतकी भागीदारी करत इंग्लंडला दिवसभर यश मिळू दिले नाही. त्यामुळेच स्टोक्सने हा अनावश्यक वाद निर्माण केल्याचा आरोप अश्विनने केला आहे.

# टीम इंडिया नवा इतिहास रचण्यासाठी मैदानात -गंभीर

**लंडन : वृत्तसंस्था**

इंग्लंडविरुद्धच्या मँचेस्टर कसोटी सामन्यात भारतीय संघानं अशक्यप्राय वाटणारा सामना अनिर्णित राखण्यात यश मिळवले. मॅच ड्रॉ झाल्यावर टीम इंडियाचे संघाचे मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी पत्रकार परिषदेत आपल्या खास शैलीत वेगवेगळ्या गोष्टींवर भाष्य केले.

मी जे काही केले ते इतिहासजमा झाले, असे म्हणत गंभीर यांनी त्यांच्या जुन्या इनिंगची आठवण करून दिल्यावर छोड़ो कल की बातें, कल की बात पुरानी नए दौर में लिखेंगे, मिल कर नई कहानी हम हिंदुस्तानी हे गाणे गायले.

टीम इंडियाने मँचेस्टर कसोटी सामना अनिर्णित राखण्यात यश मिळाल्यावर पत्रकार परिषदेत कोच गौतम गंभीर यांना नेपीयर कसोटीतील खेळीचा दाखला देत प्रश्न विचारण्यात आला होता. केएल राहुल आणि कर्णधार शुबमन गिल यांच्यासह वॉशिंग्टन सुंदर आणि रवींद्र जडेजाच्या खेळीकडे कसे बघता? त्यांची ही खेळी पहिल्यावर २००९मध्ये न्यूझीलंडविरुद्ध स्वत: केलेली खेळी आठवली का? असा प्रश्न गंभीर यांना विचारण्यात आला.

यावर गंभीर म्हणाले की, मला माझी कोणतीही इनिंग आठवत नाही. मी जे केले ते इतिहासजमा झालंय. ही टीम नवा इतिहास रचण्यासाठी मैदानात उतरतीये. कोण कुणाला फॉलो करत नाही. मँचेस्टर कसोटीत आमचा निभाव लागणार नाही, असे अनेकांना वाटले. सामना अनिर्णित राखून टीम इंडियाने आम्ही काय करू शकतो ते दाखवून दिले, असे गंभीर म्हणाले.

२००७चा पहिलावहिला टी-२० वर्ल्डकप आणि २०११मध्ये वनडे वर्ल्डकप स्पर्धा जिंकून देण्यातही गौतम गंभीरची भूमिका महत्त्वपूर्ण राहिली होती. २००७च्या टी-२० वर्ल्डकप फायनलमध्ये गंभीरने ७५ धावांची खेळी केली होती. २०११च्या वनडे वर्ल्डकप फायनलमध्येही त्याने ९७ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली, पण या दोन्ही वेळी सर्वाधिक श्रेय मिळाले ते महेंद्रसिंह धोनीला. क्रिकेटमधील कोणताही सामना जिंकण्यात एका खेळाडूचा नाही तर संघातील प्रत्येक सदस्याचा वाटा असतो, असे म्हणत गंभीरने एका व्यक्तीला श्रेय देण्यावरून अनेकदा धोनीवरही निशाणा साधला आहे. इंग्लंड दौऱ्यातील अशक्यप्राय वाटणारा सामना अनिर्णित राखल्यावर ज्यावेळी त्याला त्याच्या इनिंगचा दाखला देण्यात आला त्यावेळीही त्यांनी मी काय केले त्यापेक्षा टीम इंडियाने आता काय केले ते महत्त्वाचे आहे, यावर भर देणे पसंत केले.

# वेस्ट इंडिजचा टी-२० मालिकेतही लाजिरवाणा पराभव

**सेंट किट्स : वृत्तसंस्था**

वेस्ट इंडिजला मायदेशात एकापाठोपाठ एक मालिकांमध्ये लाजिरवाण्या पराभवाला सामोरे जावे लागले आहे. ऑस्ट्रेलियाने प्रथम तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेत वेस्ट इंडिजला पूर्णपणे पराभूत केले आणि त्यानंतर पाचव्या व अंतिम टी-२० सामन्यात १७१ धावांचे लक्ष्य यशस्वीरीत्या पार करत ५-०ने मालिका नावे केली. अशा प्रकारे विंडीजला मायदेशात सलग आठ सामन्यांत पराभव पत्करावा लागला.




ऑस्ट्रेलियाने पाचवा टी-२० सामना तीन गडी राखून जिंकला. या विजयासह ऑस्ट्रेलियाने पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत प्रथमच सर्व सामने जिंकून मालिका जिंकण्याचा पराक्रम केला आहे. ऑस्ट्रेलियन क्रिकेटच्या इतिहासात असे प्रथमच घडले आहे, की संघाने पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतील सर्व सामने जिंकले आहेत.

ऑस्ट्रेलिया आता पाच सामन्यांची टी-२० मालिका ५-०ने जिंकणारा जगातील दुसरा पूर्ण सदस्य देश ठरला आहे. यापूर्वी ही कामगिरी केवळ भारताने केली होती. भारताने २०२० साली न्यूझीलंडला त्यांच्याच भूमीवर ५-०ने पराभूत केले होते.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com